पाक्षिक
# मनोगत
प्रदेश बीजेपी

मुंबई ● वर्ष: 8 ● अंक: 5 ● 1 मार्च 2026 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.



# मतदार यादी दुरुस्ती अभियान

## भाजपा कार्यकर्त्यांची जबाबदारी




## कृषिसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

## भारताला बदनाम करण्याचा राहुल गांधींचा कट





# अध्यक्षीय मनोगत

# नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

आपल्या प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. पक्ष संघटनेत काम करण्यासाठी अनेक कार्यकर्ते इच्छुक असतात. अशी इच्छा बाळगण्यात गैर काहीच नसते. अशा स्थितीमध्ये पदाधिकारी निवडीचे काम आव्हानात्मक बनते. पदाधिकारी म्हणून काम करण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याचे समाधान करणे पक्षाला शक्य नसते. तरीही पक्ष ज्येष्ठता, क्षमता लक्षात घेऊन कार्यकर्त्यांना संधी देण्याचा प्रयत्न करीत असतो. ज्या कार्यकर्त्यांना संधी मिळत नाही, त्यांनी नाऊमेद न होता, पक्षासाठी काम करत राहिले पाहिजे. शहरी भागातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्या आहेत. काही भागातील जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका अजून बाकी आहेत. या निवडणुकांमध्ये आपल्याला क्रमांक एकचा पक्ष म्हणून सिद्ध करण्यासाठी तयारीला लागायचे आहे. २०१७ च्या तुलनेत जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यात आपण चांगली कामगिरी केली आहे. जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात निवडणुका होतील. शहरी भागाबरोबरच भारतीय जनता पार्टी ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात यश मिळवत आहे. कार्यकर्त्यांनी दाखविलेल्या निर्धार शक्तीचे हे यश आहे.

संघटनेचे प्रशिक्षण अभियान नुकतेच सुरू झाले आहे. संघटनेतील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना विविध विषयांची माहिती करून देण्यासाठी हे अभियान सुरू करण्यात आले आहे. जनसंघापासून आपल्या संघटनेची ओळख विचारधारेवर चालणारा पक्ष अशी आहे. या विचारधारेची माहिती तरूण कार्यकर्त्यांना होणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने या अभियानाची रचना करण्यात आली आहे. आपल्या पक्षाचे कार्यकर्ते जेव्हा जनतेमध्ये जातात तेव्हा त्यांना आपल्या सरकारच्या कामगिरीबरोबरच पक्षाच्या ध्येयधोरणांची सखोल माहिती असणे गरजेचे असते. राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्याने प्रशिक्षित असलेच पाहिजे. त्या दृष्टीने प्रशिक्षण अभियानाला आपण सर्वोच्च महत्व दिले आहे. या अभियानाच्या माध्यमातून आपण पक्षाच्या विचारधारेशी परिचित व्हावे तसेच संघटनेच्या आवश्यकतेनुसार अन्य विषयांचेही जाणकार व्हावे, अशी अपेक्षा आहे. या अभियानाची जबाबदारी सोपविण्यात आलेल्या संबंधित पदाधिकाऱ्यांकडून प्रशिक्षण वर्गामध्ये मार्गदर्शन केले जाणार आहे. हे अभियान १०० टक्के यशस्वी करण्याची जबाबदारी आपण सर्व यशस्वीपणे पार पाडाल, याची खात्री आहे. याचबरोबर आणखी एक महत्वाचा विषय आहे तो मतदार यादी दुरुस्ती अभियानाचा. निवडणूक आयोगाने अनेक राज्यांमध्ये हे अभियान सुरू केले आहे. ज्या मतदारांना आपल्या भारतीय नागरिकत्वाचा पुरावा दाखवता येणार नाही, अशा मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली जाणार आहेत. त्या अर्थाने हे मतदार यादी शुद्धीकरण अभियानच आहे. या अभियानात कार्यकर्त्यांना महत्वाची भूमिका पार पाडायची आहे. या अभियानात बूथ पातळीवरच्या कार्यकर्त्यांनी नेमके काय करायचे, याबाबतचे मार्गदर्शन या अंकात करण्यात आले आहे. त्यानुसार कार्यकर्त्यांनी आपली जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

मतदार यादी दुरुस्ती अभियान ०४



भारताला बदनाम करण्याचा राहुल गांधींचा कट ०८



भारत-फ्रान्सचे 21 करार १०



'एनए' मुक्ततेतून भ्रष्टाचाराला मूठमाती १३



कृषिसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद घेणारे महाराष्ट्र पहिले राज्य २२





हृदय, यकृत, फुफ्फुस प्रत्यारोपणासाठी २२ लाखांपर्यंत... ३०



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# मतदार यादी दुरुस्ती अभियान



निवडणूक आयोगाच्या मतदार यादी दुरुस्ती अभियानाला महाराष्ट्रात प्रारंभ होणार आहे. एप्रिलपासून हे अभियान (SIR) महाराष्ट्रात सुरू होणार आहे. विरोधी पक्षांनी या अभियानाबाबत खोटी-नाटी माहिती पसरवली आहे. मतदार यादी दुरुस्ती अभियान म्हणजे फार वेगळे काही नसून मतदारांचे पत्ते, नाव दुरुस्त करणे, मयत मतदारांची नावे वगळणे. या अभियानात भाजपा कार्यकर्त्यांना कोणती जबाबदारी पार पाडायची आहे, याबाबतचे मार्गदर्शन.

- मतदार याद्यांची विशेष सखोल पडताळणी ही प्रक्रिया निवडणूक आयोगाने मतदार याद्यांच्या सुधारणेसाठी सुरू केली आहे. ज्या मतदारांचे निधन झाले आहे, ज्या मतदारांचा घरचा पत्ता बदलला आहे, ज्यांच्या नावात चूक झाली असेल, ज्यांचे नांव दोन किंवा अधिकवेळा मतदार यादीत दिसत असेल अशी नावे मतदार यादीतून काढून टाकणे हा अभियानाचा उद्देश आहे. त्याचबरोबर १८ वर्षापेक्षा अधिक नवीन मतदारांची नावे समाविष्ट करण्याचे काम या मोहिमेद्वारे केले जाणार आहे.
- २००२-२००३ मध्ये अशा प्रकारची मोहिम निवडणूक आयोगाने हाती घेतली होती. या मोहिमेच्या सध्याच्या टप्प्यात १२ राज्यांमध्ये ही मोहिम राबवली जाणार आहे. १८४३ विधानसभा मतदारसंघात ही मोहिम सुरू आहे.

### 'एसआयआर'ची प्रक्रिया

- ४ नोव्हेंबर २०२५ पासून, या मोहिमेला प्रारंभ झाला आहे. याअंतर्गत निवडणूक आयोगाचे अधिकारी (BLO) घरोघरी जावून फॉर्म देणार आहेत.
- या मोहिमेसाठी २००२-२००३ ची मतदार यादी आधार बेस रोल मानली जाणार आहे. या यादीत ज्यांची नावे आहेत अशा मतदारांना निवडणूक आयोगाचे अधिकारी अंशतः भरलेला फॉर्म देणार आहेत. या फॉर्मवर मतदारांनी आपले अलीकडचे छायाचित्र चिकटवायचे आहे आणि हा फॉर्म BLO यांना परत द्यायचा आहे.
- ज्यांचे नांव २००२-२००३ च्या यादीत नसेल



## मतदार यादी दुरुस्ती अभियानासाठी प्रदेश भाजपाची समिती नियुक्त

१ ) माजी खासदार डॉ. किरीट सोमैया - संयोजक
२) खा. डॉ. भागवत कराड
३) आ. रणधीर सावरकर
४) प्रदेश सरचिटणीस ॲड. माधवी नाईक
५) आ. मंगेश चव्हाण
६) माजी संघटन मंत्री रघुनाथ कुलकर्णी
७) प्रदेश सरचिटणीस सुनिल राणे
८) माजी जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे

त्यांनी आपल्या पालकांची नावे मतदार यादीप्रमाणे फॉर्ममध्ये भरावी. तसचे या फॉर्मला आपल्या पालकांचे वोटर कार्ड सोबत जोडावे.

● ज्यांचे स्वतःचे नाव २००२-२००३ च्या मतदार यादीत नसेल तसेच ज्यांच्या पालकांचे नावही या यादीत नसेल अशांना BLO कडून देण्यात आलेला फॉर्म भरून द्यावा लागेल. **या फॉर्मबरोबर निवडणूक आयोगाने सूचित केलेल्या बारा कागदपत्रांपैकी एक कागदपत्र सादर करावे लागणार आहे.** ओळखीचा पुरावा म्हणून या कागदपत्राची पडताळणी केली जाईल.

### गणना प्रपत्र (Enumeration Form) म्हणजे काय?

● गणना प्रपत्राद्वारे मतदारांना निवडणूक आयोगाकडे आपली वैयक्तिक माहिती सादर करावयाची आहे. मतदाराची ओळख, जन्मतारीख, निवासस्थान पत्ता, कुटुंबातील अन्य सदस्यांची माहिती या अर्जाद्वारे निवडणूक आयोगाकडे सादर केली जाईल. निवडणूक आयोगाच्या फॉर्म क्र. ६ प्रमाणे हा फॉर्म आहे. मात्र यातील काही माहिती अगोदरच भरली जाते.

### हा फॉर्म कुठून मिळवावा आणि कसा भरावा?

● हा फॉर्म ऑफलाईन आणि ऑनलाईन अशा दोन्ही पध्दतीने मतदारांना मिळू शकेल.

**ऑफलाईन प्रक्रिया-** तुम्ही राहत असलेल्या भागात निवडणूक आयोगाचे अधिकारी (BLO) घरोघरी जावून हा फॉर्म देत आहेत. तुम्ही या अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधून हा फार्म मिळवू शकता. हा फॉर्म व्यवस्थित भरून आवश्यक त्या कागदपत्रांसह मतदारांना निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्याकडे सादर करायचा आहे. प्रत्येक विभागासाठी निवडणूक आयोगाने अधिकारी नेमले आहे.

**ऑनलाईन प्रक्रिया-** जर तुम्हाला हा फॉर्म ऑनलाईन भरायचा असेल तर राष्ट्रीय मतदार सेवा पोर्टलच्या https://www.nvsp.in या संकेतस्थळावर जावे लागेल. या संकेतस्थळावर मतदार यादीत नाव समाविष्ट करणे / नावात दुरुस्ती करणे या विभागात जाऊन तुम्ही आवश्यक ती माहिती भरू शकता. ही माहिती भरल्यानंतर तुम्हाला रिसीट नंबर दिला जातो. त्याच्या आधारे तुमच्या अर्जाची नेमकी स्थिती काय आहे, याची माहिती आपल्याला मिळू शकते.

### तुमचा बीएलओ (BLO) कोण आहे? बीएलओशी संपर्क कसा कराल?

● राष्ट्रीय मतदार सेवा पोर्टल किंवा व्होटर हेल्पलाईन ॲपवर जाऊन तुम्हाला याबाबतची माहिती मिळू शकते. मतदार सेवा पोर्टलवर तुमच्या जिल्ह्याचे आणि मतदारसंघाचे नाव टाकल्यावर 'तुमच्या बीएलओ'बाबतची माहिती मिळवा (Know Your BLO) हा पर्याय निवडा. तेथे तुम्हाला बीएलओचे नाव, संपर्क क्रमांक, ऑफिसचा पत्ता अशी सर्व माहिती मिळू शकते.

याखेरीज निवडणूक आयोगाने बीएलओशी संपर्क साधण्यासाठी 'बुक अ कॉल टू बीएलओ' हा पर्यायही उपलब्ध करू दिला आहे. यासंदर्भातील अधिक माहितीसाठी तुम्ही १८००११९५० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधू शकता.

# बूथ लेवल एजंट–१ ची जबाबदारी

● निवडणूक आयोगाशी संपर्क ठेवण्यासाठी प्रत्येक राजकीय पक्षाने नेमलेल्या अधिकृत प्रतिनिधीला बूथ लेवल एजंट–१ असे म्हटले जाते. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात असे प्रतिनिधी राजकीय पक्षांकडून नियुक्त केले जातात.

● त्या–त्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष किंवा प्रदेशाध्यक्षांनी अधिकार दिलेली व्यक्ती बूथ लेवल एजंटची नियुक्ती करते. यासाठी निवडणूक आयोगाचा बीएलए–१ हा फॉर्म भरून बीएलए–१ होण्यासाठी आवश्यक तो नोंदणी अर्ज पूर्ण भरून मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे (ईआरओ) कडे द्यावा लागतो. बीएलएचे नाव राज्य मुख्य मतदार अधिकाऱ्याच्या संकेतस्थळावर अपलोड झाले आहे ना, हे पाहण्याची काळजी संबंधित कार्यकर्त्यांनी घेतली पाहिजे. मतदार यादी दुरुस्ती मोहिमेसाठी (एसआयआर) पक्षाकडून प्रत्येक विधानसभा मतदारसंघात बीएलए–१ ला सहकार्य करण्यासाठी ५–६ पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल.

● ज्या कार्यकर्त्यांची बीएलए–१ म्हणून नियुक्ती होईल त्यांनी मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडून आपले ओळखपत्र प्राप्त करावे. मतदार नोंदणी अधिकाऱ्याशी कायम संपर्क ठेवणे हे बीएलए–१ चे प्रमुख काम आहे. निवडणूक आयोगाकडून मतदार याद्यांसंदर्भात ज्या–ज्या बैठका होतील, जे कार्यक्रम होतील त्या सर्वांना बीएलएने उपस्थित राहणे आवश्यक आहे. निवडणूक आयोगाकडून, मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडून जी–जी प्रक्रिया पार पाडली जात असे त्याची माहिती बीएलएने ठेवणे गरजेचे आहे.

● आपल्या पक्षाचे जिल्हाध्यक्ष आणि मंडल अध्यक्ष यांच्या संमतीने बीएलए–१ ला आपल्या विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक बूथवर एका सहकाऱ्याची बीएलए–२ नियुक्ती करता येते. त्यासाठीचा आवश्यक तो अर्ज बीएलओ अथवा मतदार नोंदणी अधिकारी (ईआरओ) आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करावा लागतो. बीएलए–१ ने आपल्या सहकाऱ्याची (बीएलए–२) नाव, संपर्क क्रमांकासह यादी मतदार नोंदणी अधिकाऱ्याला सादर केली पाहिजे. त्याची पोचपावतीही बीएलएने घेतली पाहिजे. निवडणूक आयोगाकडेही सर्व बीएलए–२ ची नावनोंदणी झाली आहे ना, हे पाहण्याची जबाबदारी बीएलए–१ ची आहे. ही नावे बीएलए–१ ने दिलेल्या बूथप्रमाणेच आहेत हे पाहण्याची काळजी घेतली पाहिजे.

● बीएलए–१ ने आपल्या सहकाऱ्यांसह २००२–२००३ ची मूळ मतदार यादी आणि सध्याची मतदार यादी याची तुलनात्मक विश्लेषण करावे. दोन्ही याद्यांमध्ये समान असलेल्या नावांचे पत्ते तपासावेत, यापैकी कोणी हयात नसेल त्या मतदारांची नावे शोधणे गरजेचे आहे.

● २००२–२००३ ची यादी आणि सध्याची मतदार यादी बीएलए–२ ना उपलब्ध करून देणे बीएलए–१ चे काम आहे.

● प्रत्येक बूथवर बीएलए–२ नियुक्त झाला आहे ना, हे पाहण्याचे कामही बीएलए–१ चे आहे. त्यासाठी पक्षातील संबंधितांशी बीएलए–१ ने समन्वय आणि संपर्क ठेवला पाहिजे.

● बीएलए–२ ना मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेची माहिती होण्यासाठी बीएलए–१ ने प्रशिक्षणात्मक कार्यक्रम आयोजित केला पाहिजे.

● पक्षाच्या दृष्टीने संवेदनशील, महत्वाच्या बूथवर काम करताना आपल्या पक्षाच्या बीएलए–२ ना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही, हे पाहण्याची जबाबदारी बीएलए–१ ची आहे. त्याचबरोबर नवीन मतदारांची नोंदणी करण्यासाठी फॉर्म क्रमांक ६ कसा भरावा यासाठीचे प्रशिक्षण बीएलए–१ ने देणे आवश्यक आहे.

● मयत मतदारांची नावे वगळण्यासाठी तसेच पत्ता बदललेल्या मतदारांसाठी बीएलए–१ ने फॉर्म क्रमांक ७ भरला पाहिजे.

● मतदार यादी शुद्धीकरणाचे (SIR) काम प्रत्येक बूथवर वेळेत पूर्ण झाले पाहिजे याकडे बीएलए–१ ने वैयक्तिक लक्ष दिले पाहिजे. नवीन मतदार नोंदताना भाजपाचा समर्थक असलेला, भाजपाबद्दल सहानुभूती असलेला एकही मतदार राहू नये, याकडे बीएलए–१ ने लक्ष द्यावे. त्याचबरोबर अन्य पक्षांकडून, व्यक्तींकडून बोगस मतदारांची नोंदणी होऊ नये, यासाठी बीएलए–१ ने प्रयत्न करावेत.

● निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार प्रत्येक बूथमध्ये १२०० पेक्षा अधिक मतदार असता कामा नये. त्यामुळे बीएलए-१ काम करत असलेल्या विधानसभा मतदारसंघात नवीन बूथ तयार होतील. त्याचबरोबर नवीन मतदान केंद्रेही तयार होतील. या सर्व प्रक्रियेकडे बीएलए-१ चे लक्ष असणे गरजेचे आहे.

● नवीन बूथ निर्मितीच्या प्रक्रियेची संपूर्ण माहिती बीएलए-१ ने ठेवली पाहिजे. त्यासाठी मतदार यादी नोंदणी अधिकाऱ्याशी नियमित संपर्क ठेवला पाहिजे.

● एखादा बूथ हलवला गेला असेल किंवा नवीन मतदान केंद्राची निर्मिती होणार असेल तर संबंधित शासकीय अधिकाऱ्यांकडून बीएलए-१ ला माहिती दिली जाते. त्यामुळे नवीन बूथ किंवा नवीन मतदान केंद्र निर्मिती प्रक्रियेत बीएलए-१ ने सक्रियतेने सहभागी झाले पाहिजे. त्यासाठी बीएलए-१ ने आपला मंडल अध्यक्ष, बीएलए-२ यांच्याशी संपर्क ठेऊन नवीन बूथ, मतदान केंद्र मतदारांच्या दृष्टीने सोयीचे असेल, याकडे लक्ष दिले पाहिजे.

● मंडल अध्यक्षांनी किंवा आपल्या बूथ पदाधिकाऱ्यांनी नवीन बूथ, मतदान केंद्राबाबत काही आक्षेप घेतले तर बीएलए-१ ने तातडीने हे आक्षेप निवडणूक अधिकाऱ्याकडे नोंदवले पाहिजेत. त्यासाठी आवश्यक तो अर्ज तातडीने दाखल केला पाहिजे. बीएलए-१ च्या आक्षेपानंतरही निवडणूक आयोगाकडून त्या बूथबाबत, नवीन मतदान केंद्राबाबत काही कार्यवाही न झाल्यास बीएलए-१ ने यासंदर्भात जिल्हाध्यक्षांना माहिती दिली पाहिजे.

● ज्या ठिकाणी अनेक मजली इमारतींच्या सोसायट्या आहेत तेथे त्या सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधून मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना त्या सोसायटीच्या ठिकाणी पोलिंग बूथ सुरू करण्याविषयी विनंती करावी. बीएलए-१ ने बीएलए-२ बरोबर तसेच बूथ समिती सदस्यांबरोबर कामाचा आढावा घेण्यासाठी दर आठवड्याला बैठक घेतली पाहिजे.

# बीएलए- २ च्या जबाबदाऱ्या

1. बीएलए-१ ला सहकार्य करण्यासाठी बीएलए-२ ला महत्वाची भूमिका बजावयाची असते. त्यासाठी बीएलए-२ ने बूथ समितीतील ५ ज्येष्ठ सदस्यांची समिती तयार केली पाहिजे. या समितीने निवडणूक आयोगाच्या आणि पक्षाकडून दिल्या गेलेल्या सूचनांचा अभ्यास करावा आणि मूळ मतदार यादी (बेस रोल) व नवी मतदार यादी यांचा तुलनात्मक अभ्यास करावा.

2. बीएलए-२ ने निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर जाऊन त्यांच्या बूथचा बीएलओ कोण आहे याबाबतची माहिती मिळवावी.

ही माहिती मिळाल्यावर संबंधित बीएलओशी संपर्क साधणे आवश्यक आहे. बीएलओकडून केल्या जाणाऱ्या नोंदणी फॉर्मच्या वाटपाबाबत बीएलए-२ ने सपूर्ण माहिती ठेवली पाहिजे.

यासंदर्भात बीएलओला आवश्यक असणारे सर्व सहकार्य बीएलए-२ ने दिले पाहिजे.

3. मतदार यादी दुरुस्ती अर्ज बीएलओकडून घरोघरी वाटले जात असताना बीएलए-२ ने बीएलओबरोबर घरोघरी गेले पाहिजे. आपल्या पक्षाच्या समर्थक मतदाराला यासंदर्भात कोणतीही अडचण आल्यास बीएलए-२ ने त्या मतदाराला संपूर्ण सहकार्य केले पाहिजे.

4. ज्या मतदारांपर्यंत निवडणूक आयोगाचे अधिकारी पोहचू शकलेले नाहीत अशा मतदारांना बीएलओशी संपर्क करून देण्याची जबाबदारी बीएलए-२ ची आहे.

5. भाजपा समर्थक प्रत्येक व्यक्तीच्या घरात मतदार पडताळणी अर्ज (इनॅम्यूरेशन फॉर्म) गेला आहे ना हे पाहण्याची जबाबदारी बीएलए-२ आणि त्यांच्या सहकाऱ्यांची आहे.

6. भाजपा समर्थक व्यक्तींच्या घरी जाऊन हे इनॅम्युरेशन फॉर्म व्यवस्थित भरले गेले आहेत आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर केले आहेत, हे पाहण्याची जबाबदारी बीएलए-२ आणि त्यांच्या सहकाऱ्यांची आहे.

7. नवीन मतदारांच्या नोंदणी फॉर्म क्रमांक ६ तसेच पत्ता बदलासाठी फॉर्म क्रमांक ८ चा वापर केला जातो.

8. बीएलए-२ ने त्याला नेमून दिलेली कामे वेळेत पूर्ण करावीत आणि आपल्या कामाचा साप्ताहिक अहवाल बीएलए-१ च्या समितीला सादर करावा. ■

# भारताला बदनाम करण्याचा राहुल गांधींचा कट

● संबित पात्रा, राष्ट्रीय प्रवक्ते




> नवी दिल्ली येथे झालेल्या पत्रकार परिषदेत श्री. पात्रा यांनी केलेल्या निवेदनाचा संक्षिप्त अंश...

**दिल्लीतील** आंतरराष्ट्रीय एआय परिषदेमध्ये काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी गोंधळ घालण्याचा प्रयत्न करून आपला देशविरोधी चेहरा पुन्हा एकदा देशाला दाखवला आहे. या आंतरराष्ट्रीय कार्यक्रमात भारताला बदनाम करण्याचे हे कारस्थान होते. हे कारस्थान काँग्रेसच्या सर्वोच्च नेतृत्वाने म्हणजे राहुल गांधी यांनी रचले होते. या कारस्थानाला सोनिया गांधी आणि प्रियंका गांधी यांचीही संमती होती. एआय शिखर परिषद हा केंद्र सरकारचा म्हणजेच देशाचा कार्यक्रम होता. हा काही भाजपाचा राजकीय कार्यक्रम नव्हता. गोंधळ घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना उपस्थित युवकांच्या संतापाला सामोरे जावे लागले, यावरून तरी काँग्रेसने धडा घ्यायला हवा. गोंधळ घालण्याचा प्रयत्न करणारे कार्यकर्ते हे युवक काँग्रेसचे पदाधिकारी आहेत. या कार्यकर्त्यांनी परिदषेतील नोंदणी प्रक्रिया पार पाडली. कार्यक्रमाच्या ठिकाणी जाताना त्यांनी टी-शर्ट उलटे घातले होते. म्हणजे टी-शर्टवरील घोषणांचा भाग आतल्या बाजूला ठेवला होता. कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रवेश मिळाल्यावर त्यांनी हा उलटा भाग सरळ करून घोषणा दिल्या. हा सारा प्रकार पद्धतशीरपणे नियोजनपूर्वक घडवलेला होता. राहुल गांधी यांच्या निवासस्थानी सोनिया गांधी आणि प्रियंका गांधी यांच्या उपस्थितीमध्ये हे कारस्थान रचण्यात आले. या परिषदेत १०० हून अधिक देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. अनेक नामवंत आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे सीईओ, संशोधक, उद्योजक या परिषदेला उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी या परिषदेच्या आयोजनाबद्दल भारताची आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रशंसा केली. संयुक्त राष्ट्रसंघाचे महासचिव ऐंटोनियो गुटेरेस, फ्रान्सचे अध्यक्ष मॅक्रॉन यासारख्या नेत्यांनी एआय शिखर परिषदेबाबत भारताचे कौतुक केले आहे. असे असताना काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हुल्लडबाजीचा प्रयत्न करत भारताला बदनाम करण्याचा डाव आखला होता. मात्र उपस्थितांकडून खिल्ली उडविली गेल्यामुळे हा डाव उधळला गेला.

काँग्रेसचा देशविरोधी भेसूर चेहरा यापूर्वीही अनेकदा दिसला आहे. २०१६ मध्ये भारतीय सैन्यदलाने सर्जिकल स्ट्राइक केल्यावर काँग्रेसने अशी कारवाई खरीच झाली का, असा प्रश्न उपस्थित करत भारतीय लष्कराच्या शौर्यावर शंका उपस्थित केली. काही महिन्यांपूर्वी झालेल्या ऑपरेशन सिंदूरवेळीही काँग्रेसने आपली देशविरोधी भूमिका दाखवली होती. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताचे काहीच नुकसान झालेले नाही, असे लष्कराने स्पष्ट केले असतानाही राहुल गांधींनी वारंवार भारताची किती विमाने पडली, असा प्रश्न विचारला. विदेशात गेल्यावर राहुल गांधी भारतातील सरकारची तुलना बोको हराम या इस्लामिक अतिरेकी संघटनेशी करतात. हा सरळ-सरळ देशद्रोह आहे. लष्कराच्या शौर्याबाबत शंका उपस्थित करणारे राहुल गांधी पाकिस्तानची भाषा बोलत असतात. अशा देशविरोधी मंडळींना एआय परिषदेमुळे भारताची जगात वाढणारी प्रतिष्ठा पाहवत नाही. त्यामुळेच या




परिषदेत गोंधळ घालून भारताचे नाव जागतिक व्यासपीठावर खराब करण्याचा डाव आखला गेला. २०१८ मध्ये डोकलाम भागात चीन सैन्याने घुसखोरी केल्यावर भारताने तातडीने हालचाली करत चीनच्या आक्रमणाला चोख उत्तर दिले होते. त्यावेळी हेच राहुल गांधी चीनच्या नेत्यांबरोबर चर्चा, वाटाघाटी करत होते. चीनच्या राज्यकर्त्यांशी कोणत्या विषयावर चर्चा झाली हे राहुल गांधींनी अजूनही सांगितलेले नाही. २००८ मध्ये सोनिया आणि राहुल गांधी यांनी क्षी जिनपिंग यांच्याबरोबर काँग्रेस पक्षाच्यावतीने कोणता करार केला होता, याची माहिती राहुल गांधींनी दिली पाहिजे. राहुल गांधींचे पणजोबा पंडित नेहरू यांनी एकेकाळी भारताचे वर्णन साप पाळणाऱ्यांचा देश असे केले होते. जगातील अन्य देशांच्या तुलनेत भारत किती मागासलेला आहे हे पंडित नेहरूंना दाखवायचे होते. आता राहुल गांधींना याच पद्धतीने भारताची जगात बदनामी करण्याची इच्छा आहे. देशाच्या प्रतिष्ठेत भर घालणाऱ्या एआय परिषदेसारख्या कार्यक्रमाचे राहुल गांधींनी स्वागत केले नसते तरी चालले असते. मात्र त्यांनी ज्या पद्धतीने या परिषदेमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय नेत्यांच्या उपस्थितीत भारताची प्रतिमा डागाळण्याचा केलेला प्रयत्न लज्जास्पद आहे. भारतीय जनता पार्टी आणि मोदी सरकारला विरोध करण्याच्या नादात काँग्रेस आता देश हिताच्या विरोधात भूमिका घेऊ लागल्याचे दिसून येत आहे. केंद्रातील सत्ता मिळत नसल्यामुळे हताश झालेले राहुल गांधी देशविरोधावर उतरले आहेत. ■

## वैफल्यग्रस्त राहुल गांधी

**समाजात दुही निर्माण होईल, अशांतता निर्माण होईल या हेतूने राहुल गांधींच्या राजकीय हालचाली असतात. खोटी माहिती प्रसारीत करून समाजाच्या वेगवेगळ्या स्तरांमध्ये सरकारी यंत्रणेविरुद्ध असंतोष निर्माण होईल, याकडे राहुल गांधी आणि अन्य काँग्रेस नेत्यांचे लक्ष असते. २०१४ पासून लोकसभा निवडणुकीमध्ये तसेच अन्य राज्यांच्या निवडणुकीमध्ये मतदारांनी नाकारल्यामुळे वैफल्यग्रस्त झालेल्या राहुल गांधींना जनतेत जाऊन विश्वास मिळवण्याऐवजी मतदारांची दिशाभूल करण्याचा शहरी नक्षलवादी मार्ग योग्य वाटतो आहे. यासाठी सरकारी यंत्रणेबद्दल अफवा पसरवणे, जाती-धर्मांमध्ये तेढ निर्माण होईल अशी वक्तव्ये करणे, धार्मिक विद्वेष वाढवण्यासाठी देशविरोधी शक्तींना बळ देणे यासारखे उद्योग राहुल गांधींची ब्रिगेड करत आहे.**

# भारत-फ्रान्सचे 21 करार

● पंतप्रधान नरेंद्र मोदी

> एव्हरेस्टला गवसणी घालणाऱ्या हेलिकॉप्टरपासून हॅमरसारख्या भेदक क्षेपणास्त्राची भारतात निर्मिती करण्यासह विविध तब्बल २१ करारांवर भारत-फ्रान्सने स्वाक्षऱ्या केल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या मुंबईत झालेल्या शिखर परिषदेत संरक्षण, कौशल्य, तंत्रज्ञान आणि आरोग्य अशा प्रमुख क्षेत्रांतील करारांमुळे उभय देशांतील धोरणात्मक भागीदारीला बळकटी मिळणार आहे. मोदी आणि मॅक्रॉन यांनी उभय देशांदरम्यान 'विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी'चीही घोषणा यावेळी केली.



**फ्रान्सचे** राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली. यावेळी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल उपस्थित होते. मुंबईत लोकभवनात झालेल्या द्विपक्षीय बैठकीनंतर दोन्ही नेत्यांनी कर्नाटकातील वेमगल येथे उभारण्यात आलेल्या टाटा-एअरबसच्या (एच १२५) लाईट युटिलिटी हेलिकॉप्टरच्या 'फायनल असेंब्ली लाईन'चे दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन केले. एव्हरेस्टच्या उंचीपर्यंत झेप घेणारे पहिले हेलिकॉप्टर या प्रकल्पातून उड्डाण घेईल आणि अन्य देशांनाही त्याची निर्यात होऊ शकेल. एअरबस आणि टाटा डव्हान्स्ड सिस्टम्स यांचा हा संयुक्त उपक्रम असणार आहे.

### मॅक्रॉन यांचे भारताला जय हो !

फ्रान्स राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या मुंबईतील भेटींनी दोन्ही देशांचे संबंध अधिक दृढ केले आहेत. मॅक्रॉन यांनी तर 'जय हो' अशी साद घालत आम्ही भारतासोबत आहोत आणि दृढपणे सोबत राहण्याचा मानस स्पष्ट बोलून दाखविला. मोदी आणि मॅक्रॉन यांनी यावेळी भारत-फ्रान्सच्या वतीने इनोव्हेशन वर्षही जाहीर केले. भारत इनोव्हेशन करतो की नाही, हा आता प्रश्न नाही. तर, भारतासोबत कोण इनोव्हेशनला चालना देणार हा आहे. याबाबत फ्रान्सचे उत्तर अत्यंत स्पष्ट आहे. फ्रान्स भारतासोबतचे सहकार्य अधिक दृढ करु इच्छितो आणि इंडोफ्रेंच संबंध अधिक मजबूत करू इच्छितो. आम्ही इथे




**मोदी–मॅक्रॉन मॅजिकः भारत–फ्रान्सचे नवे पर्व सुरूः संरक्षण क्षेत्रात भागीदारी; क्षेपणास्त्रे, पाणबुड्या खरेदीस सहमती; कर्नाटकात एव्हरेस्ट उंची गाठणाऱ्या हेलिकॉप्टरची निर्मिती.**

तुमच्यासोबत आहोत आणि आम्ही ही साथ सोडणार नाही, असे सांगत जय हो अशी साद मॅक्रॉन यांनी घातली तेंव्हा उपस्थितांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात त्यांना दाद दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रस्तावाला प्रतिसाद देत मॅक्रॉन यांनी जाहीर केले की जी–७ शिखर परिषदेपूर्वी इनोव्हेशन डे आयोजित केला जाईल. हा कार्यक्रम फ्रेंचभारतीय उपक्रमांच्या नेतृत्वाखाली होईल आणि दोन्ही देशांतील विद्यार्थी व संशोधकांना एकत्र आणेल.

### भारत फ्रान्सचा विश्वासार्ह भागीदार

भारत हा फ्रान्सचा अत्यंत विश्वासार्ह भागीदार आहे असे इमॅन्युअल मॅक्रॉन यांनी या पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. दोन्ही देशातील संबंध हे विश्वास, खुलेपणा आणि महत्त्वाकांक्षेवर आधारलेले आहेत. दोन्ही देशांमध्ये अधिक चांगल्या पद्धतीने तंत्रज्ञान हस्तांतरण करण्यावर भर दिला जाईल. जागतिक आव्हानावर मात करण्यासाठी मार्गदर्शक आराखड्यावर दोन्ही देश काम करत आहेत, असेही मॅक्रॉन यांनी सांगितले. राफेल लढाऊ विमाने, पाणबुडी किंवा एच १२५ हेलिकॉप्टर, फायटर जेट इंजिन अशा क्षेत्रांमध्ये दोन्ही देश एकत्र काम करत आहेत. भारत आणि फ्रान्सकडे जगाला देण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. युक्रेनमध्ये हल्ले झालेत ते रोखले पाहिजे, यासाठी एकत्र आले पाहिजे. दहशतवादी संघटनांना आम्ही स्पष्टपणे नाकारतो. आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर पंतप्रधान मोदींना सोबत घेण्याचा आमचा प्रयत्न असेल. जी–७ संदर्भात बैठक होण्याआधी द्विपक्षीय बैठक घेण्याचा आमचा विचार आहे, असेही मॅक्रॉन यांनी सांगितले.

### नवनिर्मिती वर्ष जाहीर

२०२६ हे 'भारत–फ्रान्स नवनिर्मिती वर्ष' (इनोव्हेशन इयर) सुरू झाल्याची घोषणा करत पंतप्रधान मोदींनी ही धोरणात्मक भागीदारी आता 'जनतेची भागीदारी' बनत असल्याचे सांगितले. स्टार्टअप, एमएसएमई, विद्यार्थी आणि संशोधक यांच्यातील देवाणघेवाण वाढवण्यासाठी नवीन केंद्रे स्थापन केली जाणार असल्याचे मोदींनी स्पष्ट केले.

भारत आणि फ्रान्स या दोन देशांतील मैत्री आता नव्या उंचीवर पोहोचली असून, दोन्ही देशांनी ती 'विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी'च्या स्तरावर नेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयोजित 'इंडिया–फ्रान्स इनोवेशन फोरम–२०२६'च्या उद्घाटनप्रसंगी ही घोषणा केली.

आरोग्य क्षेत्रासाठी 'इंडो-फ्रेंच सेंटर फॉर एआय', 'डिजिटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी सेंटर' आणि एयरोनॉटिक्समधील कौशल्य विकासासाठी 'नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याची घोषणाही यावेळी करण्यात आली.

जागतिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारत आणि फ्रान्सची भागीदारी ही जागतिक स्थैर्यासाठी महत्त्वाची शक्ती ठरेल, असा विश्वास दोन्ही नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत व्यक्त केला. २०२६ हे वर्ष भारत-युरोप संबंधांसाठी 'टर्निंग पॉईंट' ठरेल, असा आशावादही पंतप्रधान मोदींनी व्यक्त केला.

### फ्रान्समध्ये स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्र

लोथलमधील राष्ट्रीय सागरी वारसा संकुलामध्ये फ्रान्ससोबत सहकार्य करणार असल्याचे सांगतानाच फ्रान्सच्या लोकांना भारतीय संस्कृतीच्या जवळ आणण्यासाठी, लवकरच फ्रान्समध्ये स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्र सुरू करणार असल्याची घोषणा मोदी यांनी यावेळी केली.

### स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आठवणींना उजाळा

राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांचे स्वागत करताना पंतप्रधानांनी फ्रान्सच्या मार्सेलिस बंदराचा उल्लेख केला. मोदी म्हणाले, गेल्या वर्षी फ्रान्स दौऱ्यावर असताना मार्सेलिसला भेट दिली होती. याच शहरातून पहिल्या महायुद्धादरम्यान भारतीय सैनिक युरोपमध्ये दाखल झाले होते. याच समुद्रकिनारी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी ऐतिहासिक उडी मारली होती !

भारत-फ्रान्स दरम्यान मुंबईत झालेल्या २१ करारांत राजकीय, परस्पर सहकार्य, तंत्रज्ञान, संरक्षण, नवतंत्रज्ञान, आर्थिक क्षेत्रासह स्टार्ट अप, नवीकरणीय ऊर्जा आदी क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे.

उन्नत भागीदारी आणि होरायझन २०४७ या पथदर्शी आराखड्याच्या अंमलबजावणीचा नियमितपणे आढावा घेतला जाणार आहे. त्यासाठी दरवर्षी दोन्ही देशांचे परराष्ट्र मंत्री संवाद साधतील.

भारत सरकार आणि फ्रान्स यांच्यातील संरक्षण सहकार्यावरील कराराचे नूतनीकरण करतानाच भारतात हॅमर क्षेपणास्त्रांच्या उत्पादनासाठी बीईएल आणि सॅफ्रन यांच्यातील संयुक्त उपक्रमावरही दोन्ही देशांनी सहमती दर्शविली. संरक्षणासह महत्वाच्या आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानावर, संयुक्त अत्याधुनिक तंत्रज्ञान विकास गटाची स्थापना. अक्षय ऊर्जा सहकार्यावरील सामंजस्य कराराचे नूतनीकरण, भारत आणि फ्रान्स यांच्यातील दुहेरी कर टाळण्याच्या करारावरील नियमांमध्ये सुधारणा यांसारख्या दस्तऐवजांवर भारत-फ्रान्सदरम्यान स्वाक्षरी करण्यात आली. वैमानिकी क्षेत्रातील कौशल्यासाठी राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यासाठी एक इरादा पत्र सामायिक करण्यात आला. ■



### एव्हरेस्टला गवसणी घालणारे हेलिकॉप्टर बनवू : मोदी

**भारत आणि फ्रान्स मिळून माऊंट एव्हरेस्टच्या उंचीपर्यंत उड्डाण करू शकणाऱ्या हेलिकॉप्टरची भारतात निर्मिती केली जाईल आणि संपूर्ण जगाला ते निर्यात केले जाईल, अशी घोषणा पंतप्रधान मोदी यांनी यावेळी केली. कर्नाटकातील वेमगल येथे उभारण्यात आलेल्या टाटा-एअरबसच्या कारखान्याचे ऑनलाईन उद्घाटन दोन्ही नेत्यांनी केले. याच प्रकल्पावर हे जगावेगळे हेलिकॉप्टर आता तयार होईल.**

# 'एनए' मुक्ततेतून भ्रष्टाचाराला मूठमाती



● चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री

> अकृषक परवानगीच्या जाचातून मुक्तता आणि पाणंद रस्त्यांचा विकास या निर्णयांमुळे ग्रामीण भागांतील जीवन सुकर होणार आहे.

**महाराष्ट्राचा** कणा असलेला महसूल विभाग आता कात टाकत आहे. तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि शेतकरी-केंद्रित धोरणांच्या माध्यमातून राज्याचा चेहरामोहरा बदलण्याचा मानस आहे. 'इझ ऑफ लिव्हिंग आणि इझ ऑफ डुंइंग बिझनेस' या सूत्रांवर यंदाचे वर्ष बेतलेले असेल. मागच्या वर्षात निर्णय घेतले, सूत्र ठरवले. अंमलबजावणी सुरूही झाली. आता कालबद्धपद्धतीने योजना, उपक्रम, निर्णय राबवत आहोत. लोककल्याणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष आहे. सर्वसामान्यांना अडचणीचे ठरतील असे ब्रिटिशकालीन किचकट कायदे बदलून ते सुसह्य करण्याचा आमच्या सरकारचा आणि विभागाचा प्रयत्न आहे. त्यातूनच अकृषक (एनए) परवानगीची अट रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. नगररचना विभागाची परवानगी घेतल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज आता संपली आहे. मैलाचा दगड ठरावा असा हा निर्णय आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वप्नातील विकसित महाराष्ट्राचे लक्ष्य साध्य करण्यासाठी राज्यातील पाणंद रस्त्यांचा वाटा सर्वांत मोठा असणार आहे. हे रस्ते ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या 'धमन्या' आहेत. ते दर्जेदार झाले, तर शेतमालाची ने-आण जलद होईल, आधुनिक यंत्रसामग्री शेतात पोहोचेल. इंडस्ट्री आणि सेवा क्षेत्राला ग्रामीण भागात वाव मिळेल. मोठी आर्थिक उलाढाल आणि रोजगार निर्मिती होईल. आम्ही प्रशासनातील क्लिष्टता कमी करण्यावर व सुसूत्रीकरणावर भर दिला आहे. सामान्य माणसाने आपल्या आयुष्याची जमापुंजी एकत्र करून शहराच्या परिघावर एखादा छोटा भूखंड किंवा घर घेण्याचे स्वप्न पाहिले, की त्याच्यासमोर सर्वांत मोठा डोंगर उभा राहत असे, तो 'एनए' (नॉन-ग्रिकल्चरल) अर्थात अकृषक परवानगीचा. पण आता काळ बदलला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील आमचे सरकार 'इझ ऑफ लिव्हिंग'साठी कटिबद्ध आहे. याच संकल्पनेतून आम्ही १० फेब्रुवारी २०२६ रोजी एक ऐतिहासिक निर्णय घेतला– तो म्हणजे 'एनए'च्या त्रासातून सर्वसामान्यांची आणि उद्योजकांची कायमची मुक्तता करण्याचा.

## ऐतिहासिक बदल कोणते?

आम्ही घेतलेल्या नवीन निर्णयानुसार, आता ज्या जमिनी विकास आराखड्यात किंवा प्रादेशिक योजनेत समाविष्ट आहेत, तिथे वेगळ्या 'एनए' परवानगीची किंवा वेगळी सनद घेण्याची गरज उरलेली नाही.

**(१) नियोजन प्राधिकरणाची मान्यताच अंतिम –** जमिनीचा झोन रहिवासी, औद्योगिक किंवा व्यावसायिक म्हणून आधीच निश्चित झाला असेल आणि तिथल्या स्थानिक प्राधिकरणाकडून (उदा. नगरपालिका, महानगरपालिका, पीएमआरडीए, एनएमआरडीए) बांधकाम नकाशा मंजूर करून घेतला असेल, तर महसूल विभागाकडे 'एनए'साठी धाव घेण्याची गरज नाही. बांधकाम परवानगी हीच 'एनए' परवानगी मानली जाईल.

**(२) एनए टॅक्सचा विळखा सुटला –** आजवर जमिनी 'एनए' झाल्यानंतर दरवर्षी अकृषक कर भरावा लागत होता. हा कर भरण्यासाठी आणि त्याच्या पावत्या जपण्यासाठी लोकांची मोठी कसरत व्हायची. आम्ही हा वार्षिक करच रद्द करण्याचा धाडसी निर्णय सरकारने घेतला आहे. आता फक्त एकदाच 'रूपांतरण शुल्क' (कन्व्हर्जन प्रीमियम) भरले की काम झाले. दरवर्षीच्या कटकटीतून जनतेला दिलासा मिळाला आहे.

**(३) एकवेळचे शुल्क –** बाजारमूल्याच्या किमान ०.५ टक्क्यांपर्यंत रूपांतरण शुल्क आकारले जाईल. हे शुल्क भरल्यानंतर कोणत्याही अटी किंवा शर्तींशिवाय जमिनीचा वापर अकृषक म्हणून करता येईल. यात महसूल विभागाचा कोणताही अधिकारी आडकाठी करू शकणार नाही.

## निर्णयाची व्याप्ती आणि परिणाम

हा निर्णय केवळ कागदोपत्री नाही, तर त्याचा थेट परिणाम महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर आणि सामाजिक रचनेवर होणार आहे. आज हजारो गृहप्रकल्प किंवा छोटे भूखंडधारक केवळ एनएच्या तांत्रिक त्रुटींमुळे रखडले आहेत. अनेक ठिकाणी जमिनीचा वापर बदलला आहे, पण कागदपत्रांवर ती आजही शेतजमीनच दिसते. यामुळे खरेदी–विक्रीमध्ये अडचणी येतात आणि बँकांकडून कर्ज मिळवताना सर्वसामान्यांची अडवणूक होते. आता या निर्णयामुळे सर्व मालमत्तांचे रेकॉर्ड स्वच्छ (क्लिअर टायटल) होतील. जेव्हा एखादा उद्योजक महाराष्ट्रात गुंतवणूक करू इच्छितो, तेव्हा त्याला सर्वात आधी जमिनीच्या प्रश्नाला सामोरे जावे लागते. उद्योग उभा करण्यापेक्षा जमिनीची कागदपत्रे गोळा करण्यातच त्याचा निम्मा उत्साह मावळतो. पण आता, जर ती जमीन औद्योगिक झोनमध्ये असेल, तर त्याला फक्त रूपांतरण शुल्क भरून थेट कामाला सुरुवात करता येईल. परवाना राज संपवून 'प्रशासन मित्र' ही संकल्पना आम्ही प्रत्यक्षात आणली आहे.

## कुळकायदा आणि वर्ग–२ बाबत स्पष्टता

येथे एक महत्त्वाची गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे. अनेक जमिनी या 'भोगवटादार वर्ग–२'मध्ये येतात किंवा त्यांना कुळकायद्याच्या अटी लागू असतात अशा जमिनींच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यकच राहील, जेणेकरून शासनाचा महसूल बुडणार नाही आणि मूळ अटींचे उल्लंघन होणार नाही. मात्र, एकदा परवानगी मिळाली की, पुन्हा 'एनए'च्या दुहेरी फेऱ्यात त्यांना अडकावे लागणार नाही. ही प्रक्रिया सुटसुटीत व्हावी यासाठी आम्ही ऑनलाइन प्रणाली अधिक सक्षम करत आहोत.

## महसूलचा रोड मॅप

आम्ही सातबारा संगणकीकृत केला, फेरफार ई–प्रणालीद्वारे सुरू केली. आता हा 'एनए' मुक्ती हे भ्रष्टाचाराला मूठमाती देण्याचे हत्यार आहे. जिथे मानवी हस्तक्षेप कमी होतो, तिथे पारदर्शकता वाढते. या निर्णयामुळे तलाठी कार्यालयापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंतचा फाइल्सचा प्रवास थांबणार आहे. ज्याप्रमाणे गृह विभाग जनतेच्या जीविताचे रक्षण करतो, कायदा व सुव्यवस्था सांभाळते अगदी त्याच पद्धतीने महसूल विभाग महाराष्ट्रातील

१४ कोटी जनतेच्या मालमत्तेचे रक्षण करतो. महसूल मंत्रीपदाच्या माझ्या वाटचालीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मला मिळालेले मार्गदर्शन सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी महत्त्वाचे ठरत आहे. त्यांनी मी महसूलमंत्री झाल्याबरोबर मला आराखडा दिला. त्यातून महसूल अधिकाऱ्यांच्या परिषदा घेण्याच्या सूचना केल्या. तेथील मंथनातून महसूलचा रोड मॅप ठरला. शेतकरी व शेतीहिताला सर्वोच्च प्राधान्य, गरिबांसाठी घरे, मालमत्ता रक्षण, पर्यावरण संरक्षण, विद्यार्थी हित, विस्थापितांना आधार, शासकीय कामांत प्रोत्साहनासाठी कर्मचारी-अधिकाऱ्यांना पदोन्नती, गतिमान व पारदर्शी प्रशासनासाठी कठोर निर्णय घेतले. तुकडेबंदी कायद्यामुळे जवळपास ६० लक्ष कुटुंबांच्या, म्हणजे सुमारे तीन कोटी नागरिकांच्या घरांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले. एक गुंठा आकारापर्यंतच्या तुकड्यांना कायदेशीर दर्जा देण्यासाठी तुकडेबंदी कायदा शिथिल करून, त्याच्या वापराबाबतची कार्यपद्धती ठरवली आहे. 'वन डिस्ट्रिक वन रजिस्ट्रेशन', ७७३ अधिकाऱ्यांची पदोन्नती, सेवाज्येष्ठता सूची, महापालिका व नगरपरिषद क्षेत्रात नकाशा योजना, स्वामित्व योजना, शेताच्या बांधावरील शेतरस्ते १२ फूट करण्याचा निर्णय, २०११ पूर्वीच्या सर्व घरांना मालकी हक्क देणे, मुंबई शहर आणि मुंबई उपनगरांसाठी दस्तनोंदणी कार्यक्षेत्र एक केल्याने एकाधिकार संपला, नवीन वारसांना स्थान देणारे जिवंत सातबारा अभियान राबविण्यात आले.

मराठवाड्यातील इनाम जमिनी 'बिनभोगवटादार वर्ग-२' मधून मुक्त करण्यात आल्या. यामुळे लाखो कुटुंबांसाठी जमिनीचे व्यवहार सुलभ झाले. दशकाहून जुना असलेला 'मदतमाश इनाम जमिनीं'च्या हस्तांतराचा प्रश्न सुटला. भोगवटादार वर्ग-२च्या जमिनी अकृषक कारणासाठी बँकांकडे गहाण ठेवताना आकारल्या जाणाऱ्या तारण शुल्काला कायदेशीर आधार मिळाला. महसूल मंत्र्यांकडील अर्धन्यायिक अधिकार राज्यमंत्री आणि सचिव (अपील) यांना प्रदान करण्यात आले. यामुळे १३ हजारांहून अधिक प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणे निकाली तर निघतीलच, शिवाय नायब तहसीलदार ते मंत्री स्तरावरील अपील ९० दिवसांच्या आतच निकाली काढण्याचे नियोजन केले जाईल. 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना' राबविण्यास मान्यता मिळाली. आता शेतकऱ्यांना शेतापर्यंत पोहोचण्यासाठी बारमाही रस्ते उपलब्ध होतील. गाळ,



माती, मुरूम यासाठीचे स्वामित्व शुल्क पूर्णपणे माफ होईल. अतिक्रमणे हटविली जातील.


महसूल खात्याची जबाबदारी स्वीकारताना मी शब्द दिला होता; हा विभाग शेतकऱ्यांचा शत्रू वाटता कामा नये. महसूल विभागाने शेतकऱ्यांच्या दु:खांना हात घातला आणि त्यातून निर्माण झाला शेतकरी-हिताचा एक स्पष्ट, ठोस आणि परिणामकारक पॅटर्न. शेतकऱ्यांच्या हातातील खरे मालकीपत्र सातबारा हा शेतकऱ्यांच्या आयुष्याचा श्वास आहे. पण दशकानुदशके वारसनोंद न झाल्याने, हिस्सा न पडल्याने, बोजा न सुटल्याने लाखो सातबारे मृत झाले होते. बँकेने कर्ज नाकारले, पीकविमा मिळाला नाही, जमीन विकता आली नाही. आम्ही ठरवले की, ३१ मार्च २०२६ पर्यंत राज्यातील प्रत्येक सातबारा जिवंत करायचा. आज लक्षावधी सातबाऱ्यावर वारसनोंदी पूर्ण झाल्या आहेत. 'सरकार आपल्या दारी' हे ब्रीदवाक्य कृतीत आणले आहे. या निर्णयामुळे प्रकल्प वेळेत पूर्ण होतील आणि व्याजाचा बोजा बिल्डरांवरून कमी होऊन तो ग्राहकांसाठी फायदेशीर ठरेल. लालफितीचा कारभार बाजूला सारून एका नव्या युगाकडे वाटचाल करत आहोत. पुढच्या टप्प्यात नोंदणी कार्यालये ही हायटेक करायची आहेत. तंत्रज्ञान हा भ्रष्टाचारावरचा सर्वांत उत्तम उपाय आहे. संपूर्ण महसूल विभाग आम्ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आणणार आहोत, ज्यामुळे जमिनीच्या नोंदींमध्ये कोणीही फेरफार करू शकणार नाही. महसूल विभागाच्या ५५ प्रकारच्या सेवा सुलभ केल्या आहेत. लोकाभिमुख प्रशासनासाठी आता आम्ही व्हॉट्सपचा वापर करणार आहोत. आमच्या १२ महत्त्वाच्या सेवा थेट तुमच्या व्हॉट्सअपवर उपलब्ध होतील. 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियाना'अंतर्गत नागरिकांची सर्व महसूलविषयक कामे एकाच ठिकाणी निस्तरली जातात. पुढच्या काळात हे अभियान आणखी सुलभ होईल. ■

# महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलर करण्याचे लक्ष्य

**देशाच्या जीडीपीमध्ये राज्याचा वाटा १३.८ टक्के, दरवर्षी १० लाख रोजगार निर्मिती, १३-१४ अब्ज डॉलर्स गुंतवणूक आणि वित्तीय शिस्तीचे लक्ष्य गाठण्याचा निर्धार**

● मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

> महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलर करण्याचे लक्ष्य, दरवर्षी १० लाख रोजगारनिर्मिती, १३ ते १४ अब्ज डॉलर्स गुंतवणुकीचे उद्दिष्ट आणि वित्तीय तूट अडीच टक्क्यांच्या खाली आणण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावर उत्तर देताना व्यक्त केला.



**राज्यपालांच्या** अभिभाषणावर सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर उत्तर दिले. भाषणाच्या सुरूवातीलाच मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवरायांनी आपल्याला जो महाराष्ट्र धर्म सांगितला तो आपण सगळे जाणतोच, मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा, आहे तितुके जतन करावे, पुढे आणिक मेळवावे, महाराष्ट्र राज्य करावे जिकडे तिकडे, अशा पद्धतीने सगळ्या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राला पुढे नेण्याचा प्रयत्न आपण करत आहोत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राने जीडीपीच्या तुलनेत कर्जाचे प्रमाण देशात सर्वोत्तम पातळीवर ठेवले आहे. देशाच्या जीडीपीमध्ये २०२४-२५ मध्ये राज्याचा वाटा १३.८ टक्के झाला असून आता ती १४ टक्क्यांच्या जवळ जाईल, असा प्राथमिक अंदाज आहे. राज्याचे बजेट नव्हे, तर अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलरची करायची आहे. सध्या राज्याची अर्थव्यवस्था सुमारे ५१ लाख कोटी रुपयांची असून २०१२-१३ मध्ये ती १३ लाख कोटी होती. अवघ्या दहा वर्षांत ती तीनपट वाढली आहे. ६६० बिलियन अर्थ व्यवस्था असलेले महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. देशातील कोणतेही राज्य महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या बरोबरीचे नसल्याचा दावा करत पुढील चार-पाच वर्षांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली नाही, तर महाराष्ट्र ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनेल आणि जगातील १३वी अर्थव्यवस्था ठरेल, सध्या महाराष्ट्राची अर्थव्यवस्था बेल्जियमच्या तोडीस तोड आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## विकसित महाराष्ट्र : केवळ दस्तऐवज नव्हे, कृती आराखडा

'विकसित महाराष्ट्र' हे केवळ पुस्तक नसून त्यावर मोठे काम झाले आहे. संसाधनांचे कार्यक्षम नियोजन करण्यासाठी 'व्हिजन मॅनेजमेंट यूनिट' स्थापन करण्यात आले आहे. राज्याच्या अमृत महोत्सवी वर्ष २०२९, २०३४ आणि २०४७ या टप्प्यांनुसार विकासाचे नियोजन केले आहे. अर्थव्यवस्थेची दिशा त्या दिशेने नेण्यासाठी रोडमॅप तयार केला आहे. हा रोडमॅप तयार करताना ३ लाख ८० हजार नागरिकांनी सहभाग घेतला आणि ७ लाखाहून अधिक नागरिकांनी सूचना केल्या. सर्वच क्षेत्रांना सामोरे ठेवून विकसित महाराष्ट्राचे चित्र तयार केले आहे. विकसित महाराष्ट्रासाठी प्रगतीशील, शाश्वतता, सर्वसमावेशकता आणि सुशासन ही चार उद्दिष्ट ठेवण्यात आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## दावोस करार : अंमलबजावणीतही अग्रेसर




दावोस येथे जागतिक अर्थव्यवस्था एकत्र येते, त्यामुळे तेथील करारांना विशेष महत्त्व असते. महाराष्ट्राचे महत्त्व तेथे वाढले आहे. थेट परकीय कंपन्या येत नसल्या तरी भारतीय कंपन्यांमध्ये परकीय भांडवल गुंतलेले असते आणि अशा कंपन्यांशी करार होतात, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

गुंतवणुकीच्या सायकलमध्ये करारापासून उत्पादनापर्यंत दोन ते सात वर्षे लागतात. २०२२ मधील ९८ टक्के, २०२३ मधील ८० टक्के, २०२४ मधील ७० टक्के आणि २०२५ मधील ८८ टक्के करार विविध टप्प्यांवर अंमलबजावणीत आहेत. २०२६ साठी ३१ लाख कोटींचे करार झाले असून त्यातील ६७ टक्के उद्योग विभागाचे, तर काही एमएमआरडीएचे आहेत. याशिवाय १० लाख कोटींचे करार प्रक्रियेत असून त्याबाबत लवकरच निर्णय होईल. १८ देशांतील कंपन्यांचा सहभाग असलेल्या या करारांमध्ये ८३ टक्के परकीय गुंतवणूक आहे. उत्तर महाराष्ट्रातील नंदूरबार जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रातील सर्व जिल्हे तसेच राज्यातील सर्व भागांमध्ये गुंतवणूक आली आहे. थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असून देशातील ३९ टक्के एफडीआय राज्यात येते. हे केवळ इरादे नसून आरबीआयच्या आकडेवारीनुसार प्रत्यक्ष गुंतवणूक आहे. दावोसमध्ये करार केलेल्या छत्रपती संभाजीनगरमध्ये जेएसडब्ल्यूचा इलेक्ट्रिकल वाहन उत्पादन प्रकल्पासंदर्भातील करार वेगाने अंमलात येत असून जूनमध्ये काम सुरू होईल. दावोसमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, डाटा सेंटर, चक्रिय अर्थव्यवस्था, शाश्वत विकास, कृषी तंत्रज्ञान, हरित ऊर्जा यासह अनेक क्षेत्रात गुंतवणूक आली आहे. मायक्रोसॉफ्ट, गुगल, यासारखे अनेक जागतिक पातळीवर कंपन्या गुंतवणूक करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## बेरोजगारी दर घटला; १.५ लाख सरकारी नियुक्त्यांचा टप्पा



राज्यात बेरोजगारीचा दर ११ टक्क्यांपेक्षा जास्त कधीच नव्हता, असे स्पष्ट करून मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यातील बेरोजगारी दर २०२१-२२ मध्ये ४ टक्के, २०२२-२३ मध्ये ३.३ टक्के आणि २०२३-२४ मध्ये ३.१ टक्क्यांवर आला आहे. महायुती सरकार आल्यानंतर १,२०,४४९ जणांना सरकारी नोकऱ्या देण्यात आल्या असून पुढील दोन महिन्यांत हा आकडा दीड लाखांपर्यंत जाईल. दरवर्षी १० लाख रोजगारनिर्मितीचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. रोजगार निर्मितीसाठी राज्याने स्टार्टअप, उद्योजकता आणि नावीन्य धोरणाला मान्यता दिली असून १४६ हून अधिक उपक्रमांना चालना देण्यात आली आहे.

## गडचिरोलीची वाटचाल 'स्टील सिटी'च्या दिशेने



गडचिरोलीतील गुंतवणुकीतून ७०,८९५ रोजगार निर्माण होणार आहेत. 'जल, जंगल आणि जमीन' या तत्वांवर विकास करताना ५ कोटी वृक्षलागवड हाती घेतली आहे. स्थानिक आदिवासी युवक-युवतींना रोजगारात प्राधान्य दिले जात आहे. आदिवासी मुलगी आज ट्रक चालवून ५३ हजार रुपये कमावत असल्याचे उदाहरण त्यांनी दिले. ४० आदिवासी विद्यार्थी ऑस्ट्रेलियातील जागतिक दर्जाच्या कर्टन विद्यापीठात मायनिंगचे प्रशिक्षण घेत असून गडचिरोलीला 'स्टील सिटी' बनवण्याचे काम सुरू असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

## महाराष्ट्र हे देशाचे स्टार्टअप कॅपिटल



देशातील नोंदणी केलेल्या स्टार्टअपपैकी २० टक्के स्टार्टअप हे महाराष्ट्रातील आहेत. देशातील ११९ युनिकॉर्नपैकी २८ महाराष्ट्रात आहेत. देशाच्या २५ टक्के युनिकॉर्न हे महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे आपले राज्य स्टार्टअप हब बनले असून 'स्टार्टअप कॅपिटल' म्हणून ओळख निर्माण झाली असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

## कुंभमेळा : श्रद्धा आणि शाश्वत विकास यांचा संगम



कुंभमेळा ही 'इन्टॅन्जिबल फेथ' आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. विविध पंथ, जाती आणि धर्माचे लोक येथे एकत्र येतात. कुंभमेळ्यामुळे उत्तर प्रदेशचे जागतिक स्तरावर ब्रँडिंग झाले. आपल्यालाही नाशिक कुंभमेळ्यामध्ये महाराष्ट्राचे जागतिकस्तरावर ब्रँडिंग करायचे आहे. प्रयागराजमध्ये गुंतवणुकीपेक्षा अधिक परतावा मिळाल्याचे उदाहरण देत नाशिक परिसरात गोदावरी पूर्णपणे स्वच्छ करण्याचे, सांडपाणी नदीत न जाण्याचे, विमानतळ उभारणी व रस्ते विस्ताराचे काम हाती घेतले आहे. कुंभमेळ्यामुळे धार्मिक पर्यटन वाढीस चालना मिळणार असून राज्याची अर्थव्यवस्था बदलण्यास मदत होणार आहे. हे केवळ कुंभपुरते मर्यादित नसून शाश्वत शहर उभारणी आणि राज्याचे जागतिक ब्रँडिंग यासाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## मराठीलाच प्राधान्य



हिंदी सक्तीच्या विषयात मागील शासनकाळात डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली १८ तज्ज्ञांची समिती नेमण्यात आली होती. १४ सप्टेंबर २०२१ रोजी सादर झालेल्या १०१ पानी अहवालात इंग्रजी व हिंदी दुसरी भाषा म्हणून पहिलीपासून लागू करण्याची शिफारस होती. ३० जानेवारी २०२२ रोजी मंत्रिमंडळाने त्यास मान्यता दिली होती. मात्र, मराठी हीच राज्यात सक्तीची भाषा राहील, इतर भाषा सक्तीच्या नसतील, असे स्पष्ट करुन बहुभाषिक असणे चुकीचे नसल्याचेही त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी

अभियांत्रिकीपासून ते वैद्यकीय शिक्षणापर्यंत सर्व अभ्यासक्रम मातृभाषेतून शिकण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे, असेही त्यांनी सांगितले.

उच्च शिक्षणातील शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेल्या ९५.५८ टक्के विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम वितरित करण्यात आली आहे. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना व राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेत २०२३-२४ मध्ये ९८ टक्के विद्यार्थ्यांना तर सन २०२४-२५ मध्ये ९६ टक्के विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला असल्याचे सांगितले.

## युवा प्रशिक्षण योजना ही केवळ तरुणांना अनुभव मिळण्यासाठी



युवा प्रशिक्षण धोरण जाहीर करतानाच ११ महिन्यांचा कालावधी निश्चित केला होता. नोकरीसाठी जाताना 'अनुभव काय?' असा प्रश्न विचारला जातो. त्यामुळे या योजनेतून सुमारे एक लाख युवकांना विविध विभागांत ११ महिने कामाची संधी देऊन प्रमाणपत्र दिले. त्यामुळे त्यांच्याकडे राज्य प्रशासनात काम केल्याचा अधिकृत अनुभव आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. या योजनेतून कोणालाही कायमस्वरूपी नोकरी देण्याची 'बॅकडोअर एन्ट्री' शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रोजगार निर्मितीबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २०२४-२५ मध्ये ७६७ दीनदयाल रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले. या मेळाव्यांत ७,२७३ उद्योजक सहभागी झाले. एकूण १,२७,३५७ उमेदवारांनी सहभाग घेतला असून त्यापैकी ३८,५१२ जणांची निवड झाली. २०२५-२६ मध्ये आतापर्यंत ३७२ रोजगार मेळावे घेण्यात आले. त्यात २०,०६९ उद्योजक सहभागी झाले; १,२९,६५७ उमेदवारांपैकी २४,१०१ जणांची नोकरीसाठी निवड करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

## विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी टास्क फोर्स



विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याबाबत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'महाराष्ट्र विद्यार्थी संरक्षण आणि मानसिक कल्याण धोरण २०२५' संदर्भात शासनाने अहवाल तयार केला आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विशेष 'टास्क फोर्स' स्थापन करण्यात आली असून प्रत्येक विद्यापीठाने कोणती पावले उचलली याचा आढावा टास्क फोर्स घेत आहे.

## सीमावादावर शासनाची भूमिका एकसंध

सीमावादाबाबत राज्याची भूमिका एकसंध असून समितीने सुचवलेल्या सर्व बाबी शासनाने केल्या आहेत. योग्य वकील नियुक्त केले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच उच्च न्यायालयात लवकर सुनावणी घेण्यासाठी पाठपुरावा करण्याच्या सूचना राज्याच्या महाधिवक्त्यांना दिल्या आहेत.

## शेतकऱ्यांना १५,४७२ कोटींची थेट मदत

पूर्वीची पीक विमा योजना ही शेतकऱ्यांच्या हिताची नव्हती. तसेच पिकविमा पद्धतीतील गैरप्रकार टाळण्यासाठी



सुधारणा करण्यात आली. मागील वर्षी शेतकऱ्यांवर आलेल्या संकटकाळात राज्य शासनाने १५,४७२ कोटी रुपये डीबीटीद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले आहेत. कर्जमाफीचे आश्वासन उचित वेळी पूर्ण केले जाईल. 'ग्रीस्टॅक'द्वारे डिजिटल जमीन नोंदणी आणि आधार संलग्न करून मदत देण्यात येईल. या माध्यमातून शेतीचा डिजिटल रेकॉर्ड तयार केला जात आहे. या रेकॉर्डमध्ये शेतकऱ्यांची नोंदणी, त्यांच्या जमिनीची नोंदणी, सातबाराचा अहवाल याची यात नोंद असेल.

हा डिजिटल रेकॉर्ड, आधार क्रमांक या सर्व गोष्टी एकत्रित ठेवून कर्जमाफीबाबत विचार केला जात आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. मका खरेदीचे लक्ष्य वाढवले असून धानासाठीही लक्ष्य वाढवले जाणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

## कृषी पंप, वीज सवलत आणि विक्रम



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मागेल त्याला कृषी पंप योजनेत मागणी केलेल्या ८५ टक्के शेतकऱ्यांना कृषी पंप देण्यात आले. २०२२ ते २०२५ दरम्यान १०.६३ लाख पंप बसवले. एका महिन्यात ५० हजार पंप बसवण्याची गिनीज बुकमध्ये नोंद झाली. वीजबिल सवलतीपोटी २३ हजार कोटी खर्च करण्यात आले आहेत. सिंचन व पाणी वापरामध्ये महाराष्ट्राला सर्वोत्तम राज्याचा पुरस्कार मिळाल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## कर्करोग उपचारासाठी त्रिस्तरीय प्रणाली

राज्यात त्रिस्तरीय कर्करोग उपचार व्यवस्था सुरू करण्यात आली आहे. महाकेअर फाऊंडेशनच्या माध्यमातून कॅन्सरवरील उपचाराची व्यवस्था उभारण्यात येणार आहे.




## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी ४०० कोटी



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील स्मारकासाठी यावर्षी ४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. स्ट्रक्चरलचे काम शंभर टक्के पूर्ण झाले असून प्रवेशद्वार इमारतीचे काम ९६ टक्के झाले आहे. स्मारकाचे काम लवकर पूर्ण केले जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. शिवस्मारकाबाबत उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयातील सुनावण्यांचा आढावा घेत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने प्रकरण पुन्हा उच्च न्यायालयाकडे पाठवले आहे. सुनावणी पूर्ण होईपर्यंत 'स्टेटस को' ठेवण्याचे निर्देश आहेत. राज्य शासन सातत्याने पाठपुरावा करत आहे.

## प्रशासनिक सुधारणा आणि डिजिटायझेशनवर भर

राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा व प्रशिक्षण विषयक धोरण तयार करण्यात आले आहे. अनेक विभागांचे सेवाप्रवेश नियम कालबाह्य झाले होते, ते बदलण्यात आले आहेत. राज्यात ई एचआरएमएस प्रणाली सुरू करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका, विभागीय चौकशी आदी सर्व गोष्टी आता ऑनलाईन करण्यात येत आहेत. १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत अनेक विभागांनी उल्लेखनीय कामगिरी केली. १९६० पासून एकाच विषयावर काढलेल्या शासन निर्णयांचे एकत्रिकरण सुरू आहे. सेवापुस्तिकांचे डिजिटायझेशन आणि प्रशासन सुलभ करण्याचे काम सुरू आहे.

**भाषणाच्या शेवटी मुख्यमंत्र्यांनी खुदसे जितने की जिद है मेरी, मुझे खुदको ही हराना है...**

**मै भीड नहीं हू दुनिया की, मेरे अंदर भी जमाना है या कवितेच्या ओळी उद्धत करून सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचे काम शासन करेल, असा निर्धार व्यक्त केला. ■**

# ३२ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली

## मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेला वाढता प्रतिसाद

**राज्यातील** शेतकऱ्यांमध्ये पाणी बचतीबाबत जागरूकता वाढत असून कमी पाण्यात अधिक उत्पादन घेण्यासाठी सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात अवलंब केला जात आहे. मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेअंतर्गत मागील पाच वर्षांत राज्यात तब्बल ३२ लाख ४२ हजार ९०८ हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले आहे. त्यामुळे पाण्याचा वापर लक्षणीयरीत्या कमी झाला असून उत्पादन व उत्पादकतेत वाढ झाल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.

केंद्र शासनाच्या पंतप्रधान कृषी सिंचन योजनेअंतर्गत राज्यात सूक्ष्म सिंचन घटक प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सिंचनाखालील क्षेत्र वाढवणे आणि पाण्याचा कार्यक्षम वापर करणे, हा या योजनेचा उद्देश आहे. ठिबक आणि तुषार सिंचनामुळे पिकांना आवश्यक त्या प्रमाणात पाणीपुरवठा होत असल्याने पाणी बचत होतेच, शिवाय उत्पादनातही वाढ होत आहे. परिणामी, राज्यात सूक्ष्म सिंचन संचांच्या मागणीत सातत्याने वाढ होत आहे.

राज्यात २०२०–२१ पासून सूक्ष्म सिंचनासाठी अर्ज प्रक्रिया महाडीबीटी पोर्टलद्वारे पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली आहे. अर्ज नामंजूर झाल्यास संबंधित शेतकऱ्यांना त्याची माहिती देऊन पुन्हा अर्ज करण्याची संधी दिली जाते. यंदा या ऑनलाइन प्रक्रियेचे सहावे वर्ष सुरू आहे. गेल्या तीन वर्षांत या योजनेसाठी १ हजार २०१ कोटी २३ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यापैकी १ हजार ११० कोटी ४५ लाख रुपयांचा खर्च झाला असून उर्वरित ९० कोटी ७८ लाख रुपयांचे वाटप सुरू आहे.

अनुदान वितरण प्रक्रियाही टप्याटप्याने राबवली जाते. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना निधी उपलब्ध झाल्यानंतर तालुकानिहाय आर्थिक लक्षांक निश्चित केले जातात. त्यानुसार, तालुका कृषी अधिकारी प्राधान्य क्रमानुसार अर्जदारांना ऑनलाइन पूर्वसंमती देतात. पूर्वसंमती पत्र मिळाल्यानंतर शेतकऱ्यांनी एका महिन्याच्या आत नोंदणीकृत कंपनीच्या वितरकाकडून सूक्ष्म सिंचन



संच बसवणे बंधनकारक आहे. मुदतीत संच बसवला नाही तर पूर्वसंमती आपोआप रद्द होते. संच बसवल्यानंतर शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अनुदान मागणी प्रस्ताव तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक असते. त्यानंतर कृषी पर्यवेक्षकांकडून प्रत्यक्ष तपासणी करून अहवाल महाडीबीटी प्रणालीवर नोंदवला जातो. तपासणी पूर्ण झाल्यानंतर अनुदानाची परिगणना करून रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर आरटीजीएसद्वारे जमा केली जाते.

योजनेअंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के, तर सर्वसाधारण भूधारक शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान देण्यात येते. याशिवाय, मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतून पूरक अनुदान म्हणून अनुक्रमे २५ आणि ३० टक्के अतिरिक्त लाभ दिला जातो. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना एकूण सुमारे ८० टक्क्यांपर्यंत अनुदानाचा लाभ मिळत आहे. सूक्ष्म सिंचनाच्या वाढत्या वापरामुळे जलसंधारणाला चालना मिळत असून राज्यातील शेती अधिक सक्षम आणि शाश्वत करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले जात असल्याचे चित्र आहे. सूक्ष्म सिंचनामुळे पाणी बचतीसह उत्पादनातही वाढ होत आहे. कमी पाण्यात अधिक उत्पन्न मिळवण्याचा आत्मविश्वास शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला आहे. यामुळे राज्यातील शेती अधिक शाश्वत आणि सक्षम बनत आहे. ■

# कृषिसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

**एआय फॉर ॲग्री २०२६ परिषदेचे उद्घाटन; कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित ॲप्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचे लोकार्पण**

> शेतकऱ्याने डिजिटल सेवांचा आत्मविश्वासाने वापर केला पाहिजे. शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या विविध डिजिटल ॲपमुळे शेतकरी त्यांच्या भाषेत संवाद साधून शेती विषयक प्रश्नांचे उत्तर त्वरित मिळवू शकतात. महा-एआय इनोव्हेशन सेंटरद्वारे विद्यापीठे, संशोधन संस्था, उद्योग यांना एकत्र आणून एका डिजिटल सक्षम परिसंस्थेद्वारे शेतकऱ्यांचे जीवनमान सुकर करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांच्या व्यापक हितासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीचा सर्वसमावेशक विकास करण्यावर शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.




'**महाराष्ट्र** कृषी–कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५–२०२९' धोरणांतर्गत येथील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे 'जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन'(एआय फॉर ॲग्री २०२६) च्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंह, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, अपर मुख्य सचिव (कृषी) विकास चंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प संचालक परिमल सिंह, जागतिक बँकेचे कार्यकारी संचालक परमेश्वरन अय्यर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताने डिजिटल पायाभूत सुविधा आणि एआयला राष्ट्रीय विकासासाठी महत्वाचे स्थान दिले आहे. इंडिया एआय मिशनचा उद्देश तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समावेशकता, पारदर्शकता आणि व्यापक परिणामकारकता

आहे. शेती हे प्रत्येक घराशी व प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाशी निगडित असलेले क्षेत्र आहे. कृषी क्षेत्राला पुढे नेण्याचा संकल्प करण्यात येत असून महाराष्ट्र राज्य एआय क्रांतीत आघाडीवर राहिल. सर्वसमावेशक एआय कृषी धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरले आहे.

शेतकऱ्यांसाठी महा-विस्तार एआय हा डिजिटल साथीदार विकसित करण्यात आला आहे. याच्या सहाय्याने शेती विषयक सल्ला, हवामान व कीड व्यवस्थापनाविषयी माहिती, बाजार भावाचे संकेत आदींसह शासकीय योजनांपर्यंत सुलभ प्रवेशही मिळणार आहे. आतापर्यंत ३० लाख शेतकऱ्यांपर्यंत हे ॲप पोहचले असून नोंदणीमध्ये वाढ होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र केवळ एआय वापरकर्ता न राहता, जबाबदार आणि परिणाम कारक कृत्रिम बुद्धिमत्ता वापरणारे अग्रगण्य राज्य बनेल. प्रत्येकाकडे स्मार्टफोन नाही, प्रत्येक शेतकरी ॲप वापरत नाही आणि प्रत्येकाला मराठीतच माहिती हवी असेही नाही. म्हणूनच शासनाने बहुभाषिक आणि व्हॉइस-आधारित डिजिटल सुविधा सुरू केल्या आहेत. यासाठी स्थानिक भाषांना प्राधान्य देण्यात आले आहे. यामुळे शेतकरी डिजिटल सेवांचा आत्मविश्वासाने वापर करत आहेत. पुढील काळात ही सेवा प्रत्येक तालुका आणि गावापर्यंत विस्तारण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. शेतकऱ्यांसाठी महा एआय इनोव्हेशन सेंटरद्वारे विद्यापीठे, संशोधन संस्था आणि उद्योग यांना एकत्र आणून एक सक्षम आणि उपयुक्त परिसंस्था (इकोसिस्टम) उभी करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### महाराष्ट्राची 'ॲग्री एआय पॉलिसी' सर्वांसाठी अनुकरणीय - केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह

महाराष्ट्राने जाहीर केलेली स्वतंत्र 'ॲग्री एआय पॉलिसी' स्वागतार्ह असून इतर राज्यांनीही त्याचे अनुकरण करावे, असे आवाहन विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) जितेंद्र सिंह यांनी केले.

भारताने एआय क्षेत्रात केलेली प्रगती दिल्ली येथे झालेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ मध्ये अधोरेखित झाली आहे. भारताच्या एआय क्षेत्रातील कामगिरीचे जागतिक स्तरावर कौतुक झाले असून आयएमएफच्या प्रमुखांनी भारताची प्रगती अतिशय उल्लेखनीय असल्याचे नमूद केले आहे. यापाठोपाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली एआय फॉर ॲग्री परिषदेचे केलेले यशस्वी आयोजन नक्कीच कौतुकास्पद आहे, अशा शब्दात केंद्रीय राज्यमंत्री सिंह यांनी महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमाची प्रशंसा केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एआयला नैतिकता, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सर्वसमावेशकतेशी जोडले आहे. कृषी क्षेत्रात एआयचा प्रभावी वापर सुरू असून पीक उत्पादनाचा अंदाज, योग्य पिकांची निवड, हवामान अंदाज, रोगांचे लवकर निदान आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर यामुळे शेतकऱ्यांना मोठा लाभ होत आहे. देशातील विविध भागांतील शेतकऱ्यांसाठी २२ भारतीय भाषांमध्ये एआय आधारित तंत्रज्ञान विकसित केले जात असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

शेतकऱ्यांसाठी 'एआय ओपन स्टॉक फॉर फार्मर्स' तसेच कृषी क्षेत्रातील सर्व एआय करिता एकत्रित व्यासपीठ उभारण्यात येत आहे. सॉइल हेल्थ कार्ड, स्वामित्व योजना, ड्रोन मॅपिंग, हवामान अंदाजासाठी स्वतंत्र मिशन आणि जैवतंत्रज्ञान धोरणाद्वारे शेती अधिक सक्षम केली जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### शेतकरी हाच तंत्रज्ञानाचा केंद्रबिंदू - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

आजचा काळ तंत्रज्ञानाचा असला तरी कृषी क्षेत्राच्या तंत्रज्ञानात शेतकरी हाच केंद्रबिंदू असला पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, आयओटी यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाला शेतकऱ्यांच्या पारंपरिक ज्ञानाशी जोडल्यास महाराष्ट्राची शेती देशासह जगासाठी आदर्श ठरू शकते, असा विश्वास कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी यावेळी व्यक्त केला.

कृषिमंत्री भरणे म्हणाले की, महाराष्ट्राने २०२५ ते २०२९ या कालावधीसाठी एआय आधारित कृषी धोरण राबवून देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. यासाठी सुमारे ५०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. 'महाविस्तार' ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांच्या भाषेत वैयक्तिक सल्ला, बाजारभाव, हवामान माहिती आणि विविध योजनांचे मार्गदर्शन केले जात आहे. आतापर्यंत ३० लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी हे ॲप डाउनलोड केले

आहे. एआय तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अन्नसुरक्षा, हवामान बदलाशी सामना, महिला सशक्तीकरण आणि शाश्वत शेती साध्य करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. तसेच, एआय अँड अ‍ॅग्रीटेक इनोव्हेशन सेंटर स्थापन करून प्रत्येक जिल्ह्यात शेतकऱ्यांपर्यंत एआय आधारित सेवा पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे. आजचा शेतकरी केवळ कुटुंबापुरता मर्यादित न राहता देश आणि जगाच्या अन्नसुरक्षेत महत्वाची भूमिका बजावत असल्याचे सांगून एआय तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचे जीवन अधिक सक्षम, सुरक्षित आणि समृद्ध होईल, असे कृषिमंत्री भरणे यांनी सांगितले.

### कृषी क्षेत्रातील एआय अ‍ॅप्सचे लोकार्पण व सामंजस्य करार

राज्यातील शेती क्षेत्र हे अधिक आधुनिक, तंत्रज्ञानस्नेही आणि शेतकऱ्यांसाठी उपयुक्त करण्याच्या दृष्टीने कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित महत्वपूर्ण अ‍ॅप्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचे मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यामध्ये महा एजी एक्स (महा-अ‍ॅग्री डेटा एक्स्चेंज) हा राज्याचा महत्वकांक्षी डेटा प्लॅटफॉर्म असून, कृषी क्षेत्रातील माहिती सुरक्षित पद्धतीने एकत्रित करून संशोधन, नवोन्मेष आणि धोरणात्मक निर्णयांसाठी वापरण्याचा मार्ग मोकळा करणार आहे. हा प्लॅटफॉर्म नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या माध्यमातून विकसित करण्यात आला आहे. तसेच भीली आदिवासी भाषेसाठी लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) लाँच करण्यात आले असून, स्थानिक आदिवासी भाषेत कृषी विषयक माहिती आणि सल्ला उपलब्ध करून देण्याचा हा पहिला प्रयत्न आहे. नंदुरबार जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली, भाषिणी आणि एक-स्टेप संस्थेच्या सहकार्याने हे मॉडेल विकसित करण्यात आले आहे.

याशिवाय महाविस्तार (MahaVISTR) व्हॉइस टेलिफोनी अ‍ॅप सादर करण्यात आले. स्मार्टफोन नसलेल्या शेतकऱ्यांनाही फोनद्वारे शेतीविषयक प्रश्नांची उत्तरे मिळावीत, हा या अ‍ॅपचा मुख्य उद्देश आहे.

महाविस्तार (MahaVISTR) एआय आधारित कीड व रोग ओळख प्रणाली देखील यावेळी सादर करण्यात आली. पिकांच्या छायाचित्रांच्या आधारे कीड व रोग ओळखण्यास मदत करणारे हे अ‍ॅप शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

### एक स्टेप फाउंडेशन आणि जागतिक बँक यांच्यातील महत्वपूर्ण त्रिपक्षीय सामंजस्य करारावर स्वाक्षरी

एक स्टेप फाउंडेशन आणि जागतिक बँक यांच्यातील महत्वपूर्ण त्रिपक्षीय सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. महाराष्ट्राच्या एआय-सक्षम डिजिटल सार्वजनिक पायाभूत व्यवस्था 'महाविस्तार' (MahaVISTR) यांच्या स्थापत्य रचना (rchitectural Design), प्रशासकीय व शासन चौकट (Governance Frameworks), अंमलबजावणीतील अनुभव व धडे (Implementation Lessons) तसेच मुक्त मानके (Open Standards) यांचे पद्धतशीर दस्तऐवजीकरण व संकलन करण्यासाठी याचा उपयोग केला जाणार आहे. हा सामंजस्य करार कृषी, पशुसंवर्धन आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्रासाठी उपयुक्त आहे.

### नेदरलँड्समधील वॅगेनिंगेन विद्यापीठ आणि संशोधन संस्था (डब्ल्यूयूआर) यांच्यासोबत सामंजस्य करार

महाराष्ट्र शासनाच्या महा-अ‍ॅग्री एआय धोरण २०२५-२०२९ अंतर्गत नेदरलँड्समधील वॅगेनिंगेन विद्यापीठ आणि संशोधन संस्था (डब्ल्यूयूआर) यांच्यासोबत सामंजस्य करारकरण्यात आला आहे. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदार आणि प्रभावी वापर वाढविण्यासाठी स्थापन केलेल्या आर्टिफिशिअल इंटेलिजन्स फॉर अ‍ॅग्रीकल्चर रिसर्च या नेटवर्कमध्ये सहभागी होण्यासाठी नेदरलँड्समधील वॅगेनिंगेन विद्यापीठ आणि संशोधन संस्था (डब्ल्यूयूआर) यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. हा करार महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सहकार्य वाढविण्यास उपयुक्त ठरणार आहे. एआय फॉर अ‍ॅग्री २०२६ ही परिषद वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, एफएओ, युएनडीपी, आयएफएडी, वर्ल्ड बँक समूह, आशियाई विकास बँक, इंटरनॅशनल क्रॉप्स रिसर्च इन्स्टिट्यूट फॉर दी सेमी रीड ट्रॉपीक्स (आयसीआरएसएटी), भारतीय विज्ञान संस्था, एम. एस.स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशन तसेच जागतिक व राष्ट्रीय भागीदारांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे. कृषी क्षेत्रातील जागतिक तज्ज्ञ, कृषी आणि संलग्न क्षेत्रातील नवे स्टार्टअप, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था यामध्ये सहभागी झाल्या आहेत. ■

# भारतीय जनता पार्टीच्या नूतन प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीची घोषणा

## प्रदेश पदाधिकारी

| नाव | पदभार | विभाग |
|---|---|---|
| श्री. अतुल काळसेकर | उपाध्यक्ष | कोकण |
| श्रीमती. भारती पवार | उपाध्यक्षा | उत्तर महाराष्ट्र |
| श्री. संजय कौडगे | उपाध्यक्ष | मराठवाडा |
| श्री. संजय भेंडे | उपाध्यक्ष | विदर्भ |
| श्री. रामदास तडस | उपाध्यक्ष | विदर्भ |
| श्री. केशव उपाध्ये | उपाध्यक्ष | मुंबई |
| श्री. प्रवीण पोटे | उपाध्यक्ष | विदर्भ |
| आ. गोपीचंद पडळकर | उपाध्यक्ष | पश्चिम महाराष्ट्र |
| श्री. चैतन्यबापू देशमुख | उपाध्यक्ष | मराठवाडा |
| श्रीमती. प्रिया शिंदे | उपाध्यक्षा | पश्चिम महाराष्ट्र |
| श्री. सुजय विखे | उपाध्यक्ष | उत्तर महाराष्ट्र |
| श्रीमती. अर्चना पाटील चाकुरकर | उपाध्यक्षा | मराठवाडा |
| आ. निरंजन डावखरे | सरचिटणीस | कोकण |
| आ. योगेश सागर | सरचिटणीस | मुंबई |
| आ. संजय कुटे | सरचिटणीस | विदर्भ |
| श्रीमती. माधवी नाईक | सरचिटणीस | कोकण |
| श्री. राजेश पांडे | सरचिटणीस | पश्चिम महाराष्ट्र |
| श्री. सुनील राणे | सरचिटणीस | मुंबई |
| आ. प्रशांत ठाकुर | चिटणीस | कोकण |
| आ. मंगेश चव्हाण | चिटणीस | उत्तर महाराष्ट्र |
| आ. परिणय फुके | चिटणीस | विदर्भ |
| श्रीमती. वर्षा डहाळे | चिटणीस | पश्चिम महाराष्ट्र |
| श्री. संतोष जनाटे | चिटणीस | कोकण |
| श्री. संजय जगताप | चिटणीस | पश्चिम महाराष्ट्र |
| श्रीमती. अर्चना डेहनकर | चिटणीस | विदर्भ |
| श्रीमती. रोहिणी नायडू | चिटणीस | उत्तर महाराष्ट्र |
| श्री. राम सातपुते | चिटणीस | पश्चिम महाराष्ट्र |
| श्री. प्रवीण घुगे | चिटणीस | मराठवाडा |
| श्रीमती. रेखा कुलकर्णी | चिटणीस | मराठवाडा |
| श्रीमती. भैरवी वाघ | चिटणीस | उत्तर महाराष्ट्र |
| आ. मिहीर कोटेचा | कोषाध्यक्ष | मुंबई |
| श्री. अरुण लखानी | सह कोषाध्यक्ष | विदर्भ |
| श्री. रविंद्र अनासपुरे | मुख्यालय प्रभारी | पश्चिम महाराष्ट्र |
| श्री. विश्वास पाठक | मुख्यालय सह प्रभारी | मुंबई |
| श्री. नवनाथ बन | मुख्य प्रवक्ता | मुंबई |
| श्री. कृष्णराज महाडिक | युवा मोर्चा अध्यक्ष | पश्चिम महाराष्ट्र |
| आ. चित्रा वाघ | महिला मोर्चा अध्यक्षा | मुंबई |
| श्री. रामकृष्ण वेताळ | किसान मोर्चा अध्यक्ष | पश्चिम महाराष्ट्र |
| आ. योगेश टिळेकर | ओ.बी.सी मोर्चा अध्यक्ष | पश्चिम महाराष्ट्र |
| श्री. विश्वजित गायकवाड | एस.सी मोर्चा अध्यक्ष | मराठवाडा |
| श्री. देवराव होळी | एस.टी मोर्चा अध्यक्ष | विदर्भ |
| श्री. नरेंद्र पवार | भटके विमुक्त मोर्चा अध्यक्ष | कोकण |
| श्री. इद्रिस मुलतानी | अल्पसंख्यक मोर्चा अध्यक्ष | मराठवाडा |

# महाराष्ट्र, मध्य प्रदेश, बिहार आणि झारखंड या राज्यांमधील 8 जिल्ह्यांना व्यापणाऱ्या 3 बहुमार्गिका प्रकल्पांना मंत्रिमंडळाने दिली मान्यता

## या प्रकल्पांसाठी एकूण अंदाजे ९,०७२ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून ते २०३०-३१ पर्यंत होतील पूर्ण



**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने रेल्वे मंत्रालयाच्या ३ (तीन) प्रकल्पांना मंजुरी दिली. या प्रकल्पांसाठी सुमारे ९, ०७२ कोटी रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे.

**या प्रकल्पांमध्ये हे समाविष्ट कामे पुढीलप्रमाणे आहेत-**

- **गोंदिया - जबलपूर रेलमार्गाचे दुहेरीकरण**
- **पुनरख - किउल तिसरी आणि चौथी मार्गिका**
- **गमहरिया - चांडिल तिसरी आणि चौथी मार्गिका**
- **महाराष्ट्र, मध्य प्रदेश, बिहार आणि झारखंड या चार राज्यांमधील ८ जिल्ह्यांना व्यापणाऱ्या या ३ (तीन) प्रकल्पांमुळे भारतीय रेल्वेचे विद्यमान जाळे सुमारे ३०७ किलो मीटरने वाढणार आहे.**

प्रस्तावित बहुमार्गिका प्रकल्पामुळे जवळपास ९८ लाख लोकसंख्या असलेल्या सुमार ५,४०७ गावांना रेल्वे मार्ग संपर्क सुविधा मिळेल. रेल्वेच्या क्षमतेत वाढ झाल्यामुळे गतिशीलता लक्षणीयरीत्या वाढेल. यामुळे भारतीय रेल्वेची कार्यक्षमता आणि सेवा विश्वासार्हता सुधारेल. या बहुमार्गिका रेल मार्गाचा प्रस्ताव कामकाज सुलभ करण्यासाठी आणि गर्दी कमी करण्यासाठी सज्ज असणार आहे. हे प्रकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नवीन भारताच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहेत. या प्रकल्पांमुळे काही भागातील लोकांना या क्षेत्रातील व्यापक विकासाद्वारे आत्मनिर्भर बनवणे शक्य होईल. त्यांच्यासाठी रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतील.

हे प्रकल्प पंतप्रधान-गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅननुसार नियोजित आहेत त्यामुळे एकात्मिक नियोजन आणि भागधारकांच्या सल्ल्याद्वारे 'मल्टी-मॉडेल कनेक्टिव्हिटी' आणि वाहतूक कार्यक्षमता वाढविण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. हे प्रकल्प प्रवासी नागरिक तसेच वस्तू आणि सेवांच्या वाहतुकीसाठी अखंड संपर्क यंत्रणा प्रदान करतील.

प्रस्तावित क्षमता वाढीमुळे देशभरातील अनेक प्रमुख पर्यटन स्थळांसोबत रेल्वे कनेक्टिव्हिटी सुधारेल. यामध्ये कचनार शिव मंदिर (जबलपूर), कान्हा राष्ट्रीय उद्यान (बालाघाट), गंगुलपारा धरण आणि धबधबा, पेंच राष्ट्रीय उद्यान, धुंधर धबधबा, बर्गी धरण, गोमजी-सोमजी मंदिर, चांडिल धरण, दालमा हिल टॉप, हेसाकोचा धबधबा, रायजामा घाटी, दालमा वन्यजीव अभयारण्य इत्यादींचा समावेश आहे. हे प्रकल्प कोळसा, पोलाद, लोहखनिज, सिमेंट, गिट्टी आणि दगडी मुरूम, विटांसाठी लागणारी राख, खते, चुनखडी, मँगनीज, डोलोमाइट, अन्नधान्य, इंधन इत्यादी वस्तूंच्या वाहतुकीसाठी आवश्यक मार्ग आहेत. क्षमता वाढीच्या कामांमुळे ५२ एमटीपीए (प्रतिवर्षी दशलक्ष टन) अतिरिक्त मालवाहतूक होईल. रेल्वे पर्यावरणपूरक आणि ऊर्जा कार्यक्षम वाहतुकीचे साधन असल्याने, हवामान उद्दिष्टे साध्य करण्यात आणि देशाचा वाहतूक खर्च कमी करण्यात, तेल आयात (६ कोटी लीटर) कमी करण्यात आणि सीओटू उत्सर्जन कमी करण्यात (३० कोटी किलो) मदत करेल, हे प्रमाण एक कोटी झाडे लावण्याइतके आहे. ■

पाक्षिक मनोगत प्रदेश बीजेपी

# वन्यप्राण्यांनी केलेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी मिळणार पीक विमा योजनेतून भरपाई



**केंद्र** सरकारने २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्यप्राण्यांच्या पीक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पीक विमा योजनेतून देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच पूर आणि अतिवृष्टीमुळे भातपिकाचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई पीक विमा योजनेतून दिली जाईल, असेही केंद्र सरकारने जाहीर केले आहे. तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून दावे वेळेत निकाली काढली जाणार असल्याचा दावा केंद्र सरकारने केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

वाढत्या जोखीम स्तराचा विचार करून केंद्रीय कृषी विभागाने पंतप्रधान पीक विम्यातील सुधारणासाठी एक तज्ञांची समिती गठीत केली होती. या समितीच्या शिफारशीनुसार सुधारित पीक विमा योजना २०२६ च्या खरीप हंगामापासून लागू करण्यास केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी मंजुरी दिली आहे.

केंद्र सरकारने याबद्दल माहिती देताना सांगितले की, शेतकऱ्यांना देशभरात हत्ती, रानगवा, नीलगाय, हरीण, माकड अशा वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागत आहे. हे प्रकार विशेषतः जंगललगतच्या, वन्यजीव मार्गांवरील आणि डोंगराळ भागांमध्ये जास्त आढळतात.

पंतप्रधान पीक विमा योजनेच्या नवीन सुधारीत आराखड्यांतर्गत, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यातील पीक नुकसान 'स्थानिक जोखीम' या श्रेणीत पाचवा ॲड-ऑन कव्हर म्हणून मान्यता देण्यात आली आहे. असे स्पष्ट केले आहे. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे शेतीपिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान होते. परंतु पीक विमा योजनेतून त्यासाठी भरपाई मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊन शेतकरी भरपाईपासून वंचित राहतात. त्यामुळे पीक विमा योजनेत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यासाठी भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करत होते. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्याचा दावा केला आहे.

### भरपाई कशी मिळणार?

केंद्रीय कृषी मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, राज्य सरकारे संबंधित वन्यप्राण्यांची यादी जाहीर करतील. तसेच, ऐतिहासिक आकडेवारीवर आधारित पीकविमा युनिट किंवा जिल्ह्यांची निवड करतील. शेतकऱ्यांनी नुकसानीचे फोटो ७२ तासांत पिक विमा योजनेच्या ॲपवर जिओ-टॅगसह अपलोड करणे, बंधनकारक आहे.

### अंमलबजावणी कधीपासून?

केंद्रीय कृषी मंत्रालयाने निवेदनात याबद्दल सांगण्यात आले आहे की, पंतप्रधान पीक विमा योजनेच्या अंतर्गत वन्यप्राण्यांच्या नुकसान भरपाईसाठी वैज्ञानिक, पारदर्शक आणि कार्यक्षम मॉडेल तयार करण्यात आले आहे. त्याची अंमलबजावणी २०२६ च्या खरीप हंगामापासून देशभरात करण्यात येणार आहे.

### भात पिकाचा समावेश

पंतप्रधान पीक विमा योजनेतून २०१८ साली भाताच्या पिकाला पाण्यात बुडून होणाऱ्या नुकसानीसाठी स्थानिक आपत्तीच्या श्रेणीतून वगळण्यात आले होते. त्यामुळे पूर वा अतिवृष्टीच्या तडाख्याने भात पीक उद्धवस्त होऊनही पीक विमा योजनेतून भरपाई मिळत नव्हती. परंतु आता मात्र केंद्र सरकारने पुन्हा एकदा भात पिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पीक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे.

### कोणत्या राज्यांना फायदा?

या निर्णयाचा फायदा ओडिशा, छत्तीसगड, झारखंड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, उत्तराखंड अशा मानवी-वन्यजीव संघर्ष जास्त असलेल्या राज्यांमध्ये होणार आहे. तसेच आसाम, मेघालय, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, सिक्कीम, हिमाचल प्रदेश यांसारख्या हिमालयीन आणि ईशान्य राज्यांनाही फायदा होईल. पूरप्रवण किनारपट्टी भागातील भात शेती करणारे शेतकरी देखील आता या संरक्षणाखाली येतील. ■

# सूर्यघर योजनेत पाच लाख लाभार्थी

## पहिल्या दहामध्ये विदर्भातील तीन जिल्हे



**केंद्र** सरकारच्या 'पी.एम. सूर्यघर मोफत वीज योजने'तील लाभार्थ्यांची संख्या लवकरच ५ लाखांचा टप्पा गाठणार आहे. सर्वाधिक लाभार्थी असलेल्या पहिल्या दहा जिल्ह्यांमध्ये नागपूरसह विदर्भातील तीन जिल्ह्यांचा समावेश आहे. या उपक्रमामुळे राज्याची वीज निर्मिती क्षमता १ हजार ७०० मेगावॉटने वाढली आहे. या योजनेबाबत आपण आणखी जाणून घेऊ या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी योजना म्हणून 'पी.एम. सूर्यघर'कडे बघितले जाते. योजनेचा मुख्य उद्देश घरांमध्ये छतावर सोलर (सौर) पॅनेल लावताना त्यासाठी वित्तीय मदत (सब्सिडी) देणे आणि परिणामी घरांना प्रति महिना ३०० युनिटपर्यंत मोफत वीज मिळणे हा आहे. योजनेअंतर्गत ग्राहकाला १ किलोवॉटसाठी ३० हजार रुपये, २ किलोवॉटसाठी ६० हजार आणि ३ किलोवॉटपर्यंत ७८ हजार रुपये अनुदान दिले जाते. अनुदानासाठी कमाल मर्यादा ३ किलोवॉटची असून त्याहून अधिकचा प्रकल्प लावणाऱ्यालाही तीन किलोवॉट एवढेच (७८ हजार) अनुदान दिले जाते. दरम्यान राज्यात १२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत योजनेअंतर्गत ४ लाख ४७ हजार ८८४ घरांच्या छतावर रुफटॉफ (सौर ऊर्जा पॅनल) प्रकल्प कार्यान्वित झाले. त्याची वीज निर्मिती क्षमता १ हजार ७०० मेगावॉट आहे. योजनेअंतर्गत सर्वाधिक ६५ हजार २११ लाभार्थी नागपूर जिल्ह्यातील आहे. त्यानंतर पुणे जिल्ह्यात ३१ हजार ४८८ लाभार्थी, जळगावमध्ये ३० हजार ७८० लाभार्थी, छत्रपती संभाजीनगरमध्ये ३० हजार ७६३ लाभार्थी, अमरावती जिल्ह्यात २६ हजार ८५९ लाभार्थी, नाशिक जिल्ह्यात २६ हजार ७०२ लाभार्थी, कोल्हापूरला १९ हजार ६६ लाभार्थी, सोलापूरला १६ हजार ३ लाभार्थी, अहिल्यानगरमध्ये १५,९०० लाभार्थी, बुलढाणा जिल्ह्यात १५०२० लाभार्थींनी योजनेचा लाभ घेतला आहे. या आकडेवारीला महावितरणचे उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटणकर यांनी दुजोरा दिला आहे. ■

### पी. एम. सूर्यघर योजनेची स्थिती (१२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत)


| क्र. | जिल्हा | लाभार्थी संख्या | वीज क्षमता (मेगावॅट) |
|---|---|---|---|
| १ | नागपूर | ६५,२११ | २५२.२१ |
| २ | पुणे | ३१,४८८ | १४६.८९ |
| ३ | जळगाव | ३०,७८० | ११४.१० |
| ४ | छ. संभाजीनगर | ३०,७६३ | १०७.३० |
| ५ | अमरावती | २६,८५९ | १०७.२२ |
| ६ | नाशिक | २६,७०२ | ९५.७१ |
| ७ | कोल्हापूर | १९,०६६ | ८७.८९ |
| ८ | सोलापूर | १६,००३ | ५४.५४ |
| ९ | अहिल्यानगर | १५,९०० | ५३.४७ |
| १० | बुलढाणा | १५,०२० | ५४.०५ |

# कसारा-मनमाड दरम्यान तिसऱ्या, चौथ्या रेल्वे मार्गाला केंद्राची मंजुरी

**१०,१५४ कोटी रुपयांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प; ठाणे-नाशिक कनेक्टिव्हिटीमध्ये सुधारणा**

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीने महाराष्ट्रातील कसारा-मनमाड रेल्वे मार्गावर तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकच्या उभारणीला मंजुरी दिली असून या १०,१५४ कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे ठाणे आणि नाशिक जिल्ह्यांतील रेल्वे कनेक्टिव्हिटीमध्ये मोठी सुधारणा होणार आहे.

यासोबतच मंत्रिमंडळाने रेल्वेच्या एकूण तीन मल्टी ट्रॅकिंग प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या तिन्ही प्रकल्पांवर मिळून सुमारे १८,५०९ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. कसारा-मनमाड व्यतिरिक्त दिल्ली-अंबाला आणि बल्लारी-होस्पेट या विभागांतही तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिका टाकल्या जाणार आहेत. केंद्रीय रेल्वे तसेच माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयांची माहिती देताना सांगितले की, कसारा-मनमाड दरम्यानची १३१ किमी लांबीची ही योजना मुंबई-हावडा हाय-डेन्सिटी मार्गाच्या विस्तारीकरणाचा एक भाग आहे.




### दिल्ली-अंबाला आणि बल्लारी-होसपेट मार्गांचा विस्तार

मंत्रिमंडळाने दिल्ली-अंबाला (१९४ किमी, ५,९८३ कोटी रुपये) आणि बल्लारी होसपेट (६५ किमी, २,३७२ कोटी रुपये) या रेल्वे प्रकल्पांनाही मान्यता दिली आहे. या तिन्ही प्रकल्पांमुळे दिल्ली, हरियाणा, महाराष्ट्र आणि कर्नाटक या चार राज्यांतील १२ जिल्ह्यांमध्ये रेल्वेचे जाळे सुमारे ३८९ किमीने विस्तारणार आहे.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये आणि फायदे

**वाहतूक कोंडीतून सुटका-** या मार्गावर सध्या प्रवासी आणि मालवाह गाड्यांचा प्रचंड ताण आहे. अतिरिक्त मार्गिकांमुळे ही गर्दी कमी होऊन गाड्यांची संख्या वाढवणे शक्य होईल. हा प्रकल्प पुढील पाच वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

बँकिंग इंजिनची गरज संपणार प्रकल्प पूर्ण झाल्यावर कसारा-इगतपुरी घाटात रेल्वेला अतिरिक्त बँकिंग इंजिन लावण्याची गरज उरणार नाही. यामुळे परिचालन खर्च कमी होईल आणि प्रवासाच्या वेळेतही बचत होईल.

**पर्यावरण आणि अर्थव्यवस्था-** या विस्तारामुळे वार्षिक ४६.१ दशलक्ष टन अतिरिक्त मालवाहतूक शक्य होईल. यामुळे लॉजिस्टिक खर्चामध्ये वर्षाला सुमारे १.२०७ कोटी रुपयांची बचत होण्याचा अंदाज आहे. ५४ कोटी किलो कार्बन उत्सर्जन कमी होईल, जे २.२ कोटी झाडे लावण्याइतके प्रभावी ठरेल.

**पर्यटनाला चालना-** या प्रकल्पामुळे त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग, भावली धरण आणि श्री घार्टददेवी मंदिर यांसारख्या प्रमुख पर्यटन आणि धार्मिक स्थळांची कनेक्टिव्हिटी सुधारेल. ■

# हृदय, यकृत, फुफ्फुस प्रत्यारोपणासाठी २२ लाखांपर्यंत अर्थसहाय्य



> आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत जलद, पारदर्शक आणि रुग्णस्नेही उपचार मिळण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्न करीत आहे. राज्यात टीएमएस २.० प्रणालीमुळे रुग्णांकरिता पारदर्शक, जबाबदार आणि सुलभ ठरणारी आरोग्य व्यवस्था निर्माण होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

**विधानभवन** येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत राज्यातील ४ हजार ५३७ रुग्णालयांमध्ये २ हजार ३९९ मोफत उपचारांचा ऑनलाइन पद्धतीने शुभारंभ करण्यात आला आहे. या टीएमएस २.० प्रणालीचे कार्यान्वयन मध्यरात्रीपासून सुरू करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री योगेश कदम, सचिव डॉ. विनायक निपुण, सचिव ई रविंद्रन, जन आरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चव्हाण आदी उपस्थित होते.

### टीएमएस २.० प्रणाली विषयी

या प्रणालीमुळे रुग्ण नोंदणीपासून ते उपचार पूर्ण



## सहभागी झालेल्या रुग्णालयांची संख्या ४ हजार ५३७

● आंतररुग्ण कालावधीत मोफत जेवण व राहण्याची सोय आणि डिस्चार्ज नंतर रुग्णास घरी सोडवणे पर्यंत सेवा मोफत.

● उपचारांच्या संख्येत १३५६ वरून २३९९ आजारांपर्यंत वाढ, तसेच उपचार दरांमध्ये सुधारणा.

● अधिक रुग्णालये योजनेत सहभागी झाल्याने, सहभागी रुग्णालयांची संख्या १,७९२ वरून ४५३७ पर्यंत वाढली आहे. तसेच ही सेवा आता प्राथमिक आरोग्य केंद्रातूनही उपलब्ध आहे.

● TMS २.० मुळे रुग्ण नोंदणीपासून उपचार पूर्ण होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल, पारदर्शक व ऑनलाइन असून रुग्ण नोंदणी ऑनलाइन बायोमेट्रिक प्रणालीद्वारे करण्यात येते.

● HEM² २.० मुळे रुग्णालय नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन व सुलभ. निश्चित कालमर्यादेत पारदर्शक अंगीकरण.

● आयुष्मान कार्ड तयार करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात ८ वरून ३० रुपयापर्यंत वाढ.

होईपर्यंतचे संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल, पारदर्शक व ऑनलाईन होणार आहे. रुग्ण नोंदणी ऑनलाईन बायोमेट्रिक प्रणालीद्वारे करण्यात येणार आहे.

जलद उपचार मंजुरी प्रक्रिया व उपचार स्थितीचे डिजिटल ट्रॅकिंग, डिजिटल कृत्रिम बुद्धिमत्ता मॉनिटरिंगद्वारे तक्रारीचे निरसन केले जाणार आहे. या प्रणालीमध्ये रुग्णालय अंगीकरणाची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन व विहित मर्यादेत पूर्ण होणार आहे.

या योजनेअंतर्गत फसवणूक झाल्यास १५५३८८, १८००२३३२०० या हेल्पलाइनलवर संपर्क साधण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

### TMS २.० मुळे काय बदलणार?

● रुग्ण नोंदणीपासून ते उपचार पूर्ण होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल, पारदर्शक व ऑनलाईन.

● रुग्ण नोंदणी ऑनलाईन बायोमेट्रिक प्रणालीद्वारे करण्यात येणार.

● जलद उपचार मंजुरी प्रक्रिया व उपचार स्थितीचे डिजिटल ट्रॅकिंग.

● डिजिटल I मॉनिटरिंगद्वारे फसवणूक करण्यांवर खालील हेल्पलाईनवर संपर्क साधा.

● TMS २.० प्रणालीमुळे रुग्णालय अंगीकरणाची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन व विहित मर्यादित पूर्ण होणार. ■

# प्रधानमंत्री आवास योजनेत महाराष्ट्राची तिसऱ्या क्रमांकावर झेप

## मुख्यमंत्र्यांच्या नियमित आढाव्यानंतर योजनेच्या अंमलबजावणीला मोठी गती



**सर्वांसाठी** घरे' हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने राबवल्या जाणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० मध्ये महाराष्ट्राने उत्कृष्ट कामगिरी करत देशात तिसरा क्रमांक पटकावला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेचा आपल्या 'वॉर रूम' प्रकल्पात समावेश करून नियमित आढावा घेतल्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीला मोठी गती मिळाली आहे. आतापर्यंत राज्यातील सुमारे ३ लाख ४५ हजार लाभार्थ्यांनी या योजनेसाठी नोंदणी केली असल्याची माहिती गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोईर यांनी दिली.

राज्यात १५ ऑक्टोबर २०२४ पासून ही योजना प्रभावीपणे राबवण्यास सुरुवात झाली. सुरुवातीला संथगतीने चाललेल्या या योजनेला मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपाने गती मिळाली असून, केंद्र शासनाने यापूर्वीच ३ लाख ४२ हजार ११२ घरकुलांना मंजुरी दिली आहे. त्यासोबतच ७० हजार नवीन घरकुलांचे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत विशेषतः एएचपी घटकात महाराष्ट्र देशात अव्वल ठरला आहे.

सौरऊर्जा आणि हरित इमारत धोरणासारखे अभिनव उपक्रम राबवून राज्य शासन लाभार्थ्यांना अतिरिक्त अनुदानही उपलब्ध करून देत आहे. पर्यावरणपूरक विकासासाठी सौरऊर्जेचा वापर करणाऱ्या लाभार्थ्यांना ५ ते १२ हजार रुपयांपर्यंत अनुदान दिले जात असून, आतापर्यंत ४६ प्रकल्पांच्या माध्यमातून हजारो कुटुंबांना याचा लाभ मिळणार असल्याचेही भोईर यांनी स्पष्ट केले.

### आधुनिक तंत्रज्ञान आणि संस्थांची साथ

राज्याच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत केंद्र शासनाने ४० घरकुलांचा 'तंत्रज्ञान प्रात्यक्षिक प्रकल्प' मंजूर केला असून, त्याचा संपूर्ण खर्च केंद्र सरकार उचलणार आहे. या गृहनिर्माण प्रकल्पांची गुणवत्ता राखण्यासाठी आयआयटी मुंबई आणि आयआयएम मुंबई या नामांकित संस्था 'नॉलेज पार्टनर' म्हणून काम पाहणार आहेत. त्यांच्या देखरेखीखाली आधुनिक आणि पर्यावरणस्नेही तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वसामान्यांना उच्च दर्जाची घरे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. ■

# कामगार, विद्यार्थ्यांना मिळणार अल्प भाडे दरात घरे

अमरावतीत साकारणार राज्याचा पहिला भाडेतत्त्वावरील गृहनिर्माण प्रकल्प



**राज्यातील** कामगार वर्गाला दिलासा देण्यासाठी राज्य सरकार अमरावती जिल्ह्यातील नांदगाव येथे राज्यातील पहिला 'भाडेतत्त्वावरील गृहनिर्माण प्रकल्प' साकारणार आहे. औद्योगिक क्षेत्रातील कामगार आणि विद्यार्थ्यांना परवडणाऱ्या भाडे दरात निवासस्थान उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असून, यामुळे कामगारांच्या प्रवासाचा वेळ आणि खर्च वाचून त्यांची कार्यक्षमता वाढण्यास मोठी मदत होणार आहे. अमरावतीतील हा पथदर्शी प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर, अशाच धर्तीवर संपूर्ण राज्यभर भाडेतत्त्वावरील गृहनिर्माण योजना राबवण्याचा सरकारचा मानस आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत १५० एकर विस्तीर्ण क्षेत्रावर एकूण ८ हजार ४६० घरांची निर्मिती केली जाणार आहे. यामध्ये १ बीएचके, २ बीएचके आणि डॉर्मेटरी अशा विविध पर्यायांचा समावेश असेल. विशेष म्हणजे ही घरे केवळ ३ ते ४ हजार रुपयांच्या अत्यल्प मासिक भाड्यात उपलब्ध करून दिली जाणार आहेत. अनेकदा कामगार कामाच्या ठिकाणापासून दूर राहत असल्याने त्यांच्या उत्पादकतेवर परिणाम होतो, ही अडचण ओळखून सरकारने थेट औद्योगिक वसाहतीजवळच निवासाची सोय करण्याचा निर्णय घेतला आहे.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये आणि शासकीय मदत

या प्रकल्पासाठी राज्य सरकार प्रत्येक घरामागे दीड लाख रुपयांचे अनुदान देणार आहे. तसेच बांधकामासाठी ५ ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून दिली जाईल. प्रकल्पाच्या ठिकाणी रस्ते, वीज, पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण यांसारख्या सर्व मूलभूत सोयीसुविधांचे जाळे सरकारमार्फत उभारले जाणार आहे. या उपक्रमामुळे केवळ औद्योगिक विकासालाच गती मिळणार नाही, तर कामगार वर्गाच्या जीवनमानातही सकारात्मक बदल घडून येतील. या योजनेमुळे कामगारांना शहराबाहेरील औद्योगिक क्षेत्रांत हक्काचा आणि स्वस्त निवारा मिळणार असून, ही राज्यासाठी एक नवीन दिशा ठरणार आहे, असा विश्वास गृहनिर्माण विभागाने व्यक्त केला आहे. ■

# भारतीय प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी परराष्ट्र मंत्रालयाचा डिजिटल उपक्रम

**परराष्ट्र** मंत्रालयाच्या डिजिटल उपक्रमांमुळे आणि केंद्रीकृत डेटाबेसमुळे भारतीय प्रवासी समुदायाची ओळख पडताळणी आणि सुरक्षा बळकट झाली आहे. या प्रणालीचे डिजिटलीकरण केल्याने पासपोर्ट सेवा केवळ जलद आणि अधिक विश्वासार्ह झाल्या नाहीत, तर परदेशात राहणाऱ्या भारतीयांना कोणत्याही संकटाच्यावेळी त्यांच्या संबंधित भारतीय मिशनशी त्वरित संपर्क साधता येतो, अशी माहिती परराष्ट्र राज्यमंत्री कीर्तिवर्धन सिंह यांनी राज्यसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली.

डॉ. के. लक्ष्मण यांनी राज्यसभेत परराष्ट्र मंत्रालयाला जगभरातील भारतीय समुदायाचे कल्याण, सुरक्षितता आणि सुरक्षा आणि मंत्रालय आणि भारतीय मिशनच्या डिजिटल उपक्रमांबाबत एक प्रश्न सादर केला. याला उत्तर देताना राज्यमंत्री सिंह म्हणाले की, भारतीय प्रवासी समुदायाची सुरक्षा आणि सुरक्षा ही भारत सरकारच्या सर्वोच्च प्राधान्यांपैकी एक आहे. त्यांनी स्पष्ट केले की, भारतीय वंशाचे लोक कोणत्याही संकटाच्या बाबतीत मंत्रालयाने विकसित केलेल्या 'मदद' पोर्टल आणि 'सीपीजीआरएएमएस'द्वारे त्यांच्या तक्रारी नोंदवू शकतात. भारतीय प्रवासी समुदायाच्या सदस्यांच्या तक्रारीना जवळजवळ रिअल-टाइम आधारावर प्रतिसाद दिला जातो. संकटात सापडलेल्या भारतीयांना मदत करण्यासाठी परदेशातील भारतीय मिशन/पोस्टमध्ये भारतीय समुदाय कल्याण निधी (आयसीडब्ल्यूएफ) देखील स्थापन करण्यात आला आहे. ■




पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, राष्ट्रीय सह संघटन मंत्री शिवप्रकाश, मुंबई अध्यक्ष अमित साटम, गुजरातचे माजी प्रदेशाध्यक्ष के.सी. पाटील, प्रदेश सरचिटणीस आ.संजय केनेकर, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, प्रदेश मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, पवन त्रिपाठी आदी.









पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान– उपस्थिती– राष्ट्रीय संघटन मंत्री बी. एल. संतोष, राष्ट्रीय सह संघटन मंत्री शिवप्रकाश, राष्ट्रीय संघटक व्ही. सतीश, राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुग, गुजरातचे माजी प्रदेशाध्यक्ष के. सी. पाटील, खा. प्रा. मेधा कुलकर्णी, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये, ज्येष्ठ नेते माधव भांडारी, मुंबई अध्यक्ष अमित साटम, आ. योगेश सागर, आ. अतुल भातखळकर, आ. निरंजन डावखरे आदी.




पक्षप्रवेश– हिंगोली– शरद पवार गटाचे माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांचे सुपुत्र आतिश दांडेगावकर यांचा कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश– उपस्थिती– आ. तानाजी मुटकुळे, माजी आमदार प्रज्ञा सातव, जिल्हाध्यक्ष गजानन घुगे, नांदेड उत्तर ग्रामीण जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, मुख्य प्रवक्ते नवनाथ बन आदी.





मुंबई– पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान (ठाणे व कोकण विभाग)– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, खा. धैर्यशील पाटील, प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, प्रदेश मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे आदी.

## माजी आमदार अविनाश वारजूकरांचा भाजपमध्ये प्रवेश




**चिमूर** येथील काँग्रेसचे माजी आमदार अविनाश वारजूकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. अविनाश वारजूकर यांच्यासह माजी जि.प.अध्यक्ष तथा काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सतिश वारजूकर, युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा शंकरपूर ग्रामपंचायतीचे सरपंच साईश वारजूकर यांचा समावेश आहे. यावेळी खा. धैर्यशील पाटील, प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, चिटणीस आ. प्रशांत ठाकूर, प्रदेश मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे आदी उपस्थित होते.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

______________________

______________________

______________________

______________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com